नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १३० * * अकोला * | गुरुवार, दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## कंगनावर चालणार देशद्रोहाचा खटला



■ **वृत्तसंस्था, आग्रा, दि. १२ :** कंगना रणौतविरुद्ध आग्रा येथे देशद्रोह आणि शेतकऱ्यांचा अपमान केल्याचा खटला दाखल केला जाणार आहे. बुधवारी विशेष न्यायाधीश, लोकेश कुमार यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाने कंगनाविरुद्ध दाखल केलेली पुनर्विचार याचिका स्वीकारली. न्यायालयाने म्हटले आहे की आता खटला त्याच कनिष्ठ न्यायालयात चालवला जाईल ज्या न्यायालयात कंगनाचा खटला रद्द करण्यात आला होता. कंगनाच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवला होता.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## दमानिया दमकल्या

महाराष्ट्रात गेल्या दहा बारा वर्षात अंजली दमानिया नावाच्या विशाल माहिती असणाऱ्या महिलेने आता अजित पवार यांच्या विरोधात तोफ डागली आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात क्रमांक तीनवर असलेली असलेले अजित पवार त्यामुळे चांगलेच अडचणीत आलेले दिसत आहेत. गेल्या दहा वर्षापासून मोठ-मोठे संदर्भ आणि गोपनीय माहिती मिळवून अंजली दमानियाबाई जे जे आरोप करतात ते आरोप अगदी अचूक निशाणा साधणारे असतात. दमानियांच्या दमदार पणाला हल्ली नवे नवे धुमारे फुटत आहेत. अजित पवार यांच्या मुलाने म्हणजेच पार्थने १८०० कोटी रुपयांची जमीन केवळ ३०० कोटी रुपयांत खरेदी केल्यावर म्हणजेच हडप केल्यावर अंजली दमानिया पुढे आलेल्या आहेत. दमानिया एकदम दमदार आहेत त्यांची माहिती अचूक असते. पण त्यातून कोणतेही तथ्य समोर येत नाही, असे म्हणणारा फार मोठा वर्ग आहे. आज अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा कच्चा-चिठ्ठाच वाचून दाखवलेला आहे. आजकाल मोठमोठ्या शहरात मोठमोठ्या गोष्टी घडतात परंतु त्यामुळे त्या पाठीमागची खरीखुरी मोठी माणसे अलगदच बाजूला राहतात. त्याचप्रमाणे अजित पवारांच्या माध्यमातून अंजली दमानिया बाईंनी जो काही निशाणा साधला आहे त्यामुळे लक्ष्यवेध तर नक्कीच झाला आहे. याच स्तंभात आम्ही काही दिवसांपूर्वी या ठिकाणी लिहिले होते की अंजली दमानिया यामध्ये पडल्यामुळे आता त्यांच्या शिळ्या कडीला ऊत आलेला आहे. आता तर अजित पवार आणि त्यांचे नातलग यांच्या ६९ कंपन्या आहेत असे अंजली दमानिया म्हणतात त्याविषयी त्या मालिका सादर करणार आहेत. या सर्व ६९ कंपन्यापैकी अजित पवार कुटुंबाच्या मालकीच्या कंपन्या किती आहेत याचा शोध घेतला पाहिजे. काही उपद्रव वीर अजित पवार यांनी राजीनामा दिला पाहिजे असे म्हणतात तरी आम्हाला असे सांगावेसे वाटते की, कोणतीही विपरीत घटना घडली की राजीनामा देण्याचे दिवस आता संपल्यात जमा झालेले आहेत. या घटनेचे पडसाद सर्व राज्यभर पसरतील. परंतु एक गोष्ट अशी आहे की अजित पवार यांचा कोणीतरी हितशत्रू या सर्व बातम्या अंजली दमानिया बाईंना देत असावा, असे बऱ्याच ठिकाणी बोलले जात आहे. आपल्या देशाच्या राजकारणात अनेक जंगलराज करणारे नेते आहेत, बिहारमध्ये जंगलराज नावाने बोम्ब ठोकूनही सध्याचे मंगलराज टिकते की नाही हा वेगळा विषय आहे. इथे आपल्या देशावर आणि महाराष्ट्रावर कर्जावर कर्ज घेण्याचे मोठमोठे प्रकार सुरू आहेत. यावर प्रकाश टाकला तर अजूनही अनेक दिव्य बाबी समोर येतील यात शंकाच नाही. आम्ही याच स्तंभात अनेकदा लिहिलेले आहे. त्यामुळेच असे विषय चघळून चघळून चोथा झालेले आहेत. ज्यांना जे जे जमते ते ते त्यांनी करावे आणि मेले तरी मरावे, परी कीर्तिरूपे उरावे आता यापुढे अंजली दमानिया कोणावर दमकतील याची प्रतीक्षा नक्कीच सर्वांना राहील.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### दिल्ली स्फोट प्रकरणी महाराष्ट्र एटीएसकडून

# मुंब्र्यात छापेमारी

## दोघे ताब्यात




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :** नवी दिल्लीत लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ झालेल्या बॉम्ब स्फोटानंतर देशभरात छापेमारी सुरू असून महाराष्ट्रातील तपास कारवायांना वेग आला आहे. या स्फोटात १२ जणांचा बळी गेला होता आणि या प्रकरणाचा तपास आता एनआयए करत आहे. याच संदर्भात महाराष्ट्र एटीएसच्या पथकाने मुंब्रा परिसरात छापेमारी करून दोन संशयित व्यक्तींची कसून चौकशी सुरू केली आहे.

एटीएसने या दोन व्यक्तींकडून काही इलेक्ट्रॉनिक वस्तू जप्त केल्या असून त्यांचे विश्लेषण केले जाणार आहे. दिल्ली बॉम्ब स्फोटाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी सायंकाळच्या सुमारास झालेल्या या घटनेनंतर दिवसभर देशातील विविध भागांत कारवाई करण्यात आली असून अनेकांना ताब्यात घेण्यात आले आहे.

अल-कायदा या दहशतवादी संघटनेचे साहित्य बाळगल्याच्या आरोपावरून पुण्यातून एका सॉफ्टवेअर इंजिनिअरला अटक करण्यात आल्यानंतर आता महाराष्ट्र एटीएसने तपासाची व्याप्ती वाढवली आहे. याच अनुषंगाने एटीएसने आता मुंबईजवळील मुंब्रा भागात छापेमारी केली आहे.

'अल कायदा इन इंडियन सबकाँटिनेन्ट' या दहशतवादी संघटनेच्या समर्थनार्थ जिहादचा प्रसार-प्रचार करून देशाच्या एकता आणि सुरक्षिततेला धोका निर्माण केल्याचा आरोप जुबेर इलियास हंगरगेकर याच्यावर आहे. हंगरगेकर याच्या अटकेनंतर या संपूर्ण नेटवर्कचा तपास करण्यासाठी एटीएसने मुंब्रा येथे धाड टाकून कारवाई केली आहे.

सोमवारी संध्याकाळी ६:५२ वाजता लाल किल्ला मेट्रो स्टेशन पार्किंग लॉटजवळ हा स्फोट झाला. आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला आहे. २० हून अधिक जखमींवर उपचार सुरू आहेत. मृतांमध्ये दोन महिलांचा समावेश आहे. आतापर्यंत दोन मृतदेहांची ओळख पटली आहे. उर्वरितांची डीएनए चाचणीद्वारे ओळख पटवली जाईल.

मंगळवारी संध्याकाळपर्यंत, फॉरेन्सिक टीमने स्फोटस्थळावरून ४२ पुरावे गोळा केले. मीडिया रिपोर्टनुसार, दिल्ली पोलिसांच्या सुरुवातीच्या अहवालात दावा करण्यात आला आहे की कारमधील डॉक्टर मोहम्मद उमर नबी हे स्फोटापूर्वी तीन तास मेट्रो पार्किंग लॉटमध्ये बसले होते. पार्किंग लॉटमधील सीसीटीव्ही फुटेजवरून हे उघड झाले. तथापि, कार स्फोटाचा तपास आता एनआयएकडे सोपवण्यात आला आहे.

## सुरक्षा विषयक कॅबिनेटची बैठक



प्रधानमंत्री मोदींनी घेतली स्फोटातील पीडितांची भेट

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी संध्याकाळी सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीची बैठक बोलावली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे देखील उपस्थित होते. दिल्ली लाल किल्ल्यावर झालेल्या बॉम्बस्फोटानंतर ही बैठक बोलावली.

या बैठकीत दिल्ली लाल किल्ला बॉम्बस्फोटाच्या तपासावर, सुरक्षा एजन्सींचे अहवाल आणि भविष्यातील रणनीतीवर चर्चा झाली . राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर हे उपस्थित होते.

बुधवारी सकाळी पंतप्रधान मोदी भूतान दौऱ्यावरून परतल्यानंतर विमानतळावरून थेट एलएनजेपी रुग्णालयात गेले. त्यांनी स्फोटातील पीडितांची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. या कटासाठी जबाबदार असलेल्यांना सोडले जाणार नाही, हुडकून काढूच असे पंतप्रधानांनी सांगितले.

## धर्मगुरू आणि डॉक्टरला जम्मू-काश्मीरमधून अटक

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. १२ :** जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी बुधवारी हरियाणातील मेवात येथील इश्तियाक नावाच्या एका मौलवीला या मॉड्यूलच्या संबंधात अटक केली. त्याला श्रीनगरला नेण्यात आले आहे. तो अल फलाह विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये भाड्याच्या घरात राहत होता. त्याच्या घरातून २,५०० किलोहून अधिक अमोनियम नायट्रेट, पोटॅशियम क्लोरेट आणि सल्फर जप्त करण्यात आले.

मंगळवारी रात्री काश्मीरमध्ये आणखी एका डॉक्टरला अटक करण्यात आली. त्याचे नाव डॉ. तजामुल असे आहे. तो श्रीनगरमधील एसएमएचएस रुग्णालयात काम करतो. स्फोटाप्रकरणी अटक करण्यात आलेला हा काश्मीरमधील चौथा डॉक्टर आहे. आतापर्यंत १२ जणांना अटक करण्यात आली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कार कोणत्याही लक्ष्यावर आदळली नाही किंवा कोणत्याही इमारतीत प्रवेश केला नाही, म्हणजेच हा आत्मघातकी कार बॉम्बस्फोट नव्हता. या स्फोटात उमरचा मृत्यू झाला. स्फोटाच्या ढिगाऱ्यात सापडलेल्या शरीराच्या अवयवांची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी त्याच्या आईचा डीएनए नमुना गोळा केला आहे.

सोमवारी संध्याकाळी ६:५२ वाजता लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ एका पांढऱ्या आय२० कारमध्ये स्फोट झाला, ज्यामध्ये १२ जणांचा मृत्यू झाला.

## जानेवारीपासून कट रचला जात होता



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :** दिल्ली बॉम्बस्फोट घडवणारा दहशतवाद्यांचा गट फरीदाबादमधील अल फलाह विद्यापीठातून कार्यरत होता. या बॉम्बस्फोटांचा कट जानेवारीपासूनच रचला जात होता. फरीदाबादमध्ये अटक करण्यात आलेल्या डॉ. शाहीनने गेल्या दोन वर्षांपासून स्फोटके साठवत असल्याचे उघड केले.

शाहीन आणि तिच्या सहकाऱ्यांचा समावेश असलेले एक व्हाईट कॉलर दहशतवादी मॉड्यूल तयार करण्यात आले होते. या मॉड्यूलमध्ये व्यावसायिकांचा समावेश होता. सहभागी दहशतवादी जैश-ए-मोहम्मद आणि अन्सार गजवत-उल-हिंद सारख्या संघटनांशी संबंधित होते.

दरम्यान, दिल्ली बॉम्बस्फोटात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांकडे एक नाही तर दोन कार असल्याचा पोलिसांना संशय होता. बुधवारी, दिल्ली पोलिसांनी दिल्ली आणि शेजारील उत्तर प्रदेश आणि हरियाणा राज्यांमध्ये तिचा शोध घेण्यासाठी अलर्ट जारी केला. अलर्टनंतर, बुधवारी संध्याकाळी हरियाणातील खंडावली गावाजवळ ही कार जप्त करण्यात आली. ही गाडी डॉ. उमर उन नबी यांच्या नावावर नोंदणीकृत आहे.

लाल रंगाची इकोस्पोर्ट कार बुधवारी सायंकाळी फरिदाबादच्या खंदावली गावाजवळ आढळली. या स्फोटाबाबत आता नवीन खुलासे समोर येत आहेत.

## सुप्रिया सुळेंचा अजित पवारांना 'युती'चा प्रस्ताव

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १२ :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजले असून नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी मतदानाच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस निवडणुकीसाठी पुन्हा एकत्र येण्याच्या तयारीत असल्याची चिन्हे आहेत.

खासदार सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे स्थानिक निवडणुकांमध्ये एकत्र येण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही राष्ट्रवादी गटांमध्ये संवाद सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने अजित पवार आणि त्यांच्या भगिनी सुप्रिया सुळे यांच्यात एकत्र येण्याबाबत चर्चा झाली असल्याची माहिती पिंपरी-चिंचवडमधील अजित पवार गटाचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी वृत्तवाहिनीशी बोलताना दिली आहे.

## अभिनेते धर्मेंद्र यांना रुग्णालयातून डिस्चार्ज

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :** बुधवारी सकाळी अभिनेता धर्मेंद्र यांना मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. त्यांच्या डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या कुटुंबाने घरीच उपचार सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.



डॉ. प्रतीक समदानी यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, धर्मेंद्र गेल्या अनेक आठवड्यांपासून अधूनमधून रुग्णालयात दाखल होते आणि घरी परतत होते. आज सकाळी ७:३० च्या सुमारास त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. धर्मेंद्र यांना डिस्चार्ज दिल्यानंतर, गर्दी जमू नये म्हणून पोलिसांनी जुहू येथील त्यांच्या घराकडे जाणारा रस्ता बंद केला. १० नोव्हेंबर रोजी धर्मेंद्र यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांना श्वास घेण्यास त्रास होत होता आणि त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते.

सनी देओलच्या टीमने मंगळवारी जाहीर केले की धर्मेंद्र यांची प्रकृती सुधारत आहे. कृपया त्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करा. दरम्यान, ११ नोव्हेंबर रोजी सकाळी, अभिनेत्याच्या मृत्यूची खोटी बातमी माध्यमांमध्ये आली, ज्यामुळे त्यांची मुलगी ईशा देओल आणि पत्नी हेमा मालिनी यांनी संताप व्यक्त केला. ईशाने सोशल मीडियावर एक निवेदन जारी केले, ज्यामध्ये अशा चुकीच्या बातम्यांतून अफवा पसरवू नका, पप्पा लवकर बरे व्हावेत, यासाठी शुभेच्छा द्या, असे तिने या पोस्टमध्ये म्हटले आहे.

### शिवसेनेवर २१, २२ जानेवारीला

# सलग २ दिवस सुनावणी



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १२ :** शिवसेना पक्ष व चिन्हाबाबत आज अखेर सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणीला सुरूवात झाली. त्यात न्यायालयाने या प्रकरणी दोन्ही पक्षकारांना युक्तिवादासाठी किती वेळ लागेल? अशी विचारणा करत त्यांची मते जाणून घेतली.

त्यानंतर सुनावणी २१ जानेवारीपर्यंत लांबणीवर टाकली. कोर्टाने या प्रकरणी २१ व २२ असे सलग दोन दिवस सुनावणी होण्याचे संकेत दिलेत. त्यामुळे पुढच्या सुनावणीत न्यायालय दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून आपला निकाल देऊ शकते किंवा तो राखून ठेवू शकते. या सुनावणीवरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे राजकीय भवितव्य ठरणार आहे.

आज न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठापुढे शिवसेना प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणी सुरू होताच कोटार्ने ठाकरे व शिंदे गटाला तुम्हाला युक्तिवादासाठी किती वेळ लागेल? याची विचारणा केली.

त्यावर ठाकरे गटाचे वकील ज्येष्ठ विधिज्ञ देवदत्त कामत यांनी आपल्याला २ तास पुरेसे असल्याचे स्पष्ट केले. तर वकील डॉक्टर ए एम सिंघवी यांनी आपल्याला किमान ३ तास लागतील असे नमूद केले. त्यानंतर कोर्टाने या प्रकरणी काही मुद्दे एकमेकांशी जुळणारे असू शकतात असे नमूद करत सुनावणी २१ जानेवारीपर्यंत तहकूब केली.

सुप्रीम कोर्ट यासंबंधी म्हणाले, या प्रकरणी काही मुद्दे एकमेकांशी जुळणारे असू शकतात. पण प्रथम, शिवसेनेच्या प्रकरणात युक्तिवाद सुरू होतील. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या केसेस येतील. याचिकाकर्त्या पक्षाला युक्तिवादासाठी ३ तासांचा वेळ दिला जाईल. तर प्रतिवादींना २ तासांचा वेळ दिला जाईल. दोन्ही पक्षांना युक्तिवाद पूर्ण करण्यासाठी व सोयीचे संकलन करण्यासाठी १ नोडल वकील नियुक्त करता येईल.

## पार्थ पवारांना वाचवण्यात येत आहे..

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १२ :** पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने केलेल्या पुण्यातील अनधिकृत जमीन व्यवहार प्रकरणात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अनेक खुलासे केलेत.

या प्रकरणात पार्थ पवार यांना वाचवण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच या व्यवहारातील चौकशी निःपक्ष होण्यासाठी अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री तसेच पुण्याच्या पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणीही दमानिया यांनी केली.

अंजली दमानियांचा थेट आरोप



दमानिया म्हणाल्या, या व्यवहाराची चौकशी नेमण्यात आलेल्या समितीमध्ये सहा पैकी पाच सदस्य हे पुण्यातील आहेत. चौकशी समितीतील पाच सदस्य पुण्यातील असताना आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार असताना, ही समिती निःपक्ष चौकशी करू शकेल का? असा सवाल अंजली दमानिया यांनी केला.

पॉवर अटॉनीर्तून व्यवहार कसा होऊ शकतो?

दमानिया म्हणाल्या, या व्यवहारात १८०४ कोटींची जमीन ३०० कोटींना घेतली. त्यावर स्टॅम्प ड्युटी भरली नसल्याचे म्हटले जात आहे. माझा पहिला प्रश्न, तिथे असणाऱ्या गायकवाड कुटुंबाला महार वतनाची जमीन मिळाली, ती नंतर खालसा झाली. जमीन खालसा झाल्यानंतर गायकवाड कुटुंबीयांना परत कधीही दिली गेली नसताना, त्यांनी पॉवर ऑफ अटॉर्नी देऊन व्यवहार कसा करू शकतात? असा सवाल दमानिया यांनी केली.

ती जमीन गायकवाड कुटुंबीयांच्या नावावर होणे अपेक्षित होते. त्यानंतरच त्यांना हा व्यवहार करता आला असता. पण शीतल तेजवानी ११ हजार रुपये भरते. त्याचे पत्र ३० डिसेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना पाठवते आणि तेव्हा जिल्हाधिकारी त्यावर कुठलीही कारवाई करत नाही. अशा जिल्हाधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित केले पाहिजे, अशीही मागणी अंजली दमानिया यांनी केली.

## माझी लाडकी बहीण' योजनेच्या 'केवायसी'मध्ये अडचणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :** राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाखो लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत पाठवली जाते, ज्यामुळे महिलांना मोठा आधार मिळतो.



सध्या राज्य सरकारने सर्व लाभार्थी महिलांना ई-केवायसी करण्याचे आवाहन केले असून त्यासाठी संकेतस्थळही उपलब्ध करून दिले आहे.

मात्र, ही ई-केवायसी करताना येत असलेल्या अनेक तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी प्रशासकीय स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. असे असतानाच, आता महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी सर्व लाभार्थी महिलांना एक महत्त्वाची माहिती देऊन मोठा दिलासा दिला आहे.

मंत्री अदिती तटकरे यांनी महिती दिली की, लाडकी बहीण योजनेच्या संकेतस्थळामध्ये काही बदल होत आहेत, त्यामुळे वेळ लागत आहे. ज्या महिलेला पती आणि वडील नाही त्यांना केवायसी करता येत नाहीये. हीच अडचण लक्षात घेऊन आता संकेतस्थळात महत्त्वाचे बदल केले जात आहेत. या बदलांमुळे आता सर्व महिलांना केवायसी करता येईल. त्यासाठीच हे बदल केले जात आहेत, असे तटकरे यांनी सांगितले आहे.

केवायसी करण्याची अंतिम मुदत १८ नोव्हेंबर आहे. त्यामुळे लवकरात लवकर केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महिलांचा प्रयत्न सुरू आहे. परंतु, सध्या संकेतस्थळात काही बदल केले जात असून त्यामुळे वेळ लागत असल्याची माहिती अदिती तटकरे यांनी दिली आहे.

लाडकी बहीण योजनेच्या संकेतस्थळावर सध्या केवायसी करताना खूप अडचण येत आहे. या तांत्रिक अडचणीवर तटकरे यांनी भाष्य करताना म्हटले की, महिलांना येत असलेली तांत्रिक अडचण लक्षात घेण्यात आले आहेत. सध्या संकेतस्थळात काही बदल करण्यात येत आहेत. हे बदल झाल्यानंतर कोणतीही अडचण येणार नाही. लगेच केवायसीची प्रक्रिया पूर्ण होईल, असे आदिती तटकरे यांनी सांगितले आहे.

# 'स्थानिक' च्या निवडणुकांसाठी भाजपची मोर्चेबांधणी

### स्टार प्रचारकांची जम्बो यादी जाहीर



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा होताच राजकीय तापमान वाढले आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी प्रचार मोहिमेला वेग दिला असून, भाजपकडून आपल्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत पक्षातील सर्व दिग्गज नेत्यांचा समावेश आहे.

भाजप आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काही ठिकाणी महायुती म्हणून, तर काही ठिकाणी स्वबळावर लढवणार आहे. स्थानिक पातळीवरील समीकरणे लक्षात घेऊन पुढील निर्णय घेतला जाणार आहे. पक्षाने प्रत्येक जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना विजयासाठी सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. भाजपने जाहीर केलेली दिग्गज नेत्यांची स्टार प्रचारकांची यादी पाहता, पक्षाने ही निवडणूक पूर्ण ताकदीने लढवण्याची तयारी केल्याचे स्पष्ट होत आहे.

भाजपच्या स्टार प्रचारकांच्या यादीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, चंद्रशेखर बावनकुळे, विनोद तावडे, पीयूष गोयल, नारायण राणे, सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील, रावसाहेब दानवे, आशिष शेलार, मुरलीधर मोहोळ, राधाकृष्ण विखे पाटील, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, गणेश नाईक, जयकुमार रावल आणि शिवेंद्रराजे भोसले या नेत्यांची नावे समाविष्ट आहेत. ही यादी पाहता भाजपने सर्व प्रदेशांना प्रतिनिधित्व दिलं आहे.

विधानसभा निवडणुकांनंतर ही राज्यातील पहिली मोठी निवडणूक होत आहे. तसेच राज्यातील सध्याचे राजकीय वातावरण पाहता भाजप, शिवसेना शिंदे गट, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांसह सर्व पक्षांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची लढाई ठरणार आहे. महायुतीला विधानसभा निवडणुकीत मोठे यश मिळाल्यानंतर आता या निवडणुकीत मतदारांचा कल कोणत्या दिशेने झुकतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# ड्रग्ज तस्करांना भाजपच्या पायघड्या



■ **मुंबई :** तुळजापूर शहरात झालेल्या ड्रग्ज तस्करी प्रकरणातील आरोपी संतोष परमेश्वरला थेट भारतीय जनता पक्षात प्रवेश दिल्याने राजकीय वातावरण तापले आहे. विशेष म्हणजे हा प्रवेश भाजपच्या पक्ष कार्यालयात आणि वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत झाला, त्यामुळे विरोधकांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. या घडामोडीनंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे.

सुप्रिया सुळे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, ड्रग्ज तस्करीला राजाश्रय मिळतोय हे अत्यंत चिंताजनक आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना राजकीय पक्षात स्थान देणे म्हणजे समाजविघातक प्रवृत्तींना प्रोत्साहन देणे होय. त्यांनी भाजपवर अप्रत्यक्ष टीका करत म्हटलं की, लोकशाही व्यवस्थेत पक्ष वाढविण्याचा अधिकार सगळ्यांना आहे, पण गुन्हेगारांना आसरा देणे ही जबाबदार राजकारणाची पद्धत नाही. सुळे यांनी मुख्यमंत्री फडणवीसांना या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

तुळजापूर ड्रग्ज प्रकरणातला संशयित आरोपी संतोष परमेश्वर याने त्यांच्या असंख्य सहकारी कार्यकर्त्यांसह आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीमध्ये भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात पोलिसांनी बेड्या ठोकलेला आणि सध्या जामीनावर बाहेर असलेला आरोपी संतोष परमेश्वरला भाजपने पायघड्या टाकल्यात. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीमध्ये संतोष परमेश्वरने भाजपमध्ये प्रवेश केल्याने खळबळ उडाली.

# राष्ट्रीय जल पुरस्कारात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक




**मुंबई :** केंद्रीय जलशक्ती मंत्रालय, जल संसाधन, नदी विकास व गंगा संरक्षण विभाग, यांच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय जल पुरस्कार २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्याने देशातील सर्वोत्कृष्ट राज्याचा पहिला क्रमांक पटकावला आहे. पाणी संवर्धन आणि व्यवस्थापन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल हा सन्मान महाराष्ट्रराज्याला जाहीर झाला आहे.

याबाबत केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाचे सचिव व्ही.एल. कान्ता राव यांनी राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार यांना पत्राद्वारे कळविले आहे. हा पुरस्कार वितरण समारंभ १८ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात पार पडणार असून, राज्याला ट्रॉफी, प्रशस्तिपत्र आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे.

जलसंपदामध्ये राज्याला संपन्न करण्यासाठीच्या प्रयत्नांना यामुळे नवी दिशा आणि प्रेरणा मिळाल्याचे मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी म्हटले आहे. या पुरस्कारामुळे महाराष्ट्राच्या पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन आणि दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या ध्येयाला अधिक गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# शीतल तेजवानी पुन्हा चर्चेत



**पुणे :** पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील यांच्या मालकीच्या अमेडिया कंपनी मार्फत करण्यात आलेल्या एकर जमीन व्यवहार प्रकरणानंतर आता शीतल किसनचंद तेजवानी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.

शीतल तेजवानीवर बावधन आणि खडक पोलिस ठाण्यात प्रत्येकी एक गुन्हा नोंदवला गेला आहे. तिचे पती सागर सूर्यवंशी आणि स्वतः तिच्या कंपन्यांवर ४२ कोटी रुपयांचे कर्ज असून, व्याजासहित थकबाकी जवळपास १०० कोटी रुपयांपर्यंत गेल्याची माहिती आता समोर आली आहे.

शीतल तेजवानी आणि तिचे पती सागर सूर्यवंशी यांनी सेवा विकास बँकेच्या विविध शाखांतून मोठ्या प्रमाणात कर्जे घेतली होती. सागर सूर्यवंशीच्या रेणुका लॉन्स या नावाने दोन कारसाठी वेगवेगळी कर्जे घेतली गेली. एक १ कोटी १६ लाखांचे आणि दुसरे २ कोटी २४ लाखांचे. याशिवाय, शीतल तेजवानी यांनी स्वतःच्या नावाने २ कारसाठी ४ कोटी ८० लाखांचे कर्ज घेतले होते.

रेणुका लॉन्सच्या नावाने आणखी १६ कोटी ४८ लाखांचे कॅश क्रेडिट लोन, तसेच शीतल तेजवानीच्या परमाऊंट इन्फ्रा या कंपनीवर ५ कोटी ९५ लाखांचे कर्ज थकलेले आहे. या सर्व कर्जांची एकत्रित थकबाकी मुद्दल आणि व्याजासहित १०० कोटींच्या आसपास गेली आहे. २०१९ साली सहकार सह आयुक्त राजेश जाधवर यांच्या ऑडिट अहवालात सागर सूर्यवंशी आणि शीतल तेजवानी यांच्या गैरव्यवहारांचा पहिल्यांदा उल्लेख झाला होता. त्यावेळी दोघांनी कुटुंबीयांच्या नावावर एकूण १० कर्जे मिळून ४१ कोटी रुपयांचे निधी बँकेकडून घेतले होते. बनावट कागदपत्रे सादर करून ही कर्जे घेतली गेली.

# मिनी विधानसभेत भाजपाला एक नंबर बनवा!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा धुरळा उडायला आता खऱ्या अर्थाने सुरूवात झाली आहे. सर्वात मोठा पक्ष असलेला भाजपा हा कायम इलेक्शन मोडवर असतो. आगामी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या म्हणजेच मिनी विधानसभाऱ निवडणुकीत भाजपालाच एक नंबरचा पक्ष बनविण्याचा जोरदार प्रयत्न करा. महायुतीच विजयी झाली पाहिजे असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

तसेच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर भाजपच्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी महाराष्ट्र निवडणूक प्रभारी म्हणून निवड करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. महायुतीच्या माध्यमातून ५१ टक्के मते घेऊन दोन-तृतीयांश बहुमताने महाराष्ट्राच्या सर्व निवडणुका जिंकू असा विश्वास बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

## बावनकुळे भाजपाचे महाराष्ट्र निवडणूक प्रभारी



मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रदेश अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली भाजपाच्या महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या जिल्हा प्रभारींची बैठक झाली.

या बैठकीस पक्षाचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, राज्यातील विविध भागातील संघटन मंत्री, महामंत्री, मंत्रीमंडळातील मंत्री उपस्थित होते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या मिनी विधानसभा निवडणूकाच ठरणार आहेत. या निवडणुकांत भाजपाच एक नंबरचा पक्ष ठरला पाहिजे. महायुतीच जिंकली पाहिजे यासाठी सर्व जिल्हा प्रभारी आणि स्थानिक पदाधिका-यांनी जीव तोडून काम करावे अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी या बैठकीत दिल्या.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर भाजपच्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी महाराष्ट्र निवडणूक प्रभारी म्हणून निवड करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी बावनकुळेंच्या नावाची घोषणा केली.

बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्रात महायुतीच्या माध्यमातून ५१ टक्के मते घेऊन दोन-तृतीयांश बहुमताने महाराष्ट्राच्या सर्व निवडणुका जिंकू. राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व जिल्हा परिषद आणि नगरपालिका, नगरपंचायती यामध्ये भाजप-महायुती ही प्रचंड बहुमताने विजयी होईल असा मला विश्वास आहे.

**प्रत्येक जिल्ह्यात तीन मंत्र्यांची समिती**

मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रभाऱ्यांना जास्तीत जास्त महायुतीवर भर देण्याच्या, मित्रपक्षांवर टीका-टिप्पणी न करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. बावनकुळे म्हणाले की, महायुतीत समन्वय टिकवण्यासाठी प्रयत्न केले जातील. या समन्वयासाठी प्रत्येक जिल्ह्यात तीन मंत्र्यांची समिती असेल.

यामध्ये एक भाजप, एक शिवसेना आणि एक राष्ट्रवादी असे तीन मंत्री समन्वयक म्हणून काम करणार आहेत. महायुतीतील मित्रपक्षांमध्ये कुठेही मतभेद आणि मनभेद होणार नाही याची काळजी भाजप घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# स्टॅम्प ड्युटी न भरल्यास जप्ती पार्थ पवारांच्या अडचणीत वाढ



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १२ :** पार्थ पवार यांच्या मालकीच्या अमेडिया कंपनीला मोठा धक्का बसला आहे. जमीन गैरव्यवहार प्रकरणात कंपनीला स्टॅम्प ड्युटी भरण्यासाठी १० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. संबंधित प्रकरणात एकूण ४२ कोटी रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरावी लागणार असून, निश्चित वेळेत ही रक्कम न भरल्यास जप्तीची कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

अमेडिया कंपनीकडून करण्यात आलेल्या जमीन खरेदी-विक्री व्यवहारात मोठ्या अनियमितता आढळल्या होत्या. या संदर्भात महसूल विभागाने तपास सुरू केला होता. त्यात कंपनीने खरेदीखत आणि त्यानंतरचा रद्द करारनामा नोंदविताना स्टॅम्प ड्युटीची संपूर्ण रक्कम न भरल्याचे समोर आले. त्यामुळे महसूल विभागाने आता थेट नोटीस बजावत ४२ कोटी रुपयांची थकबाकी स्टॅम्प ड्युटी भरण्याचे आदेश दिले आहेत.

या रकमेत पहिल्या खरेदीखतासाठी २१ कोटी रुपये, तर करार रद्द करण्यासाठी आणखी २१ कोटी रुपये भरावे लागतील. म्हणजेच एकूण ४२ कोटी रुपयांची ड्युटी कंपनीकडून वसूल केली जाणार आहे. या नोटीसीला आता पाच दिवस उलटले असले तरी कंपनीकडून कोणतीही अधिकृत कार्यवाही झालेली नाही. महसूल अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, ठरविलेल्या दहा दिवसांच्या मुदतीत रक्कम न भरल्यास जमीन जप्तीची प्रक्रिया सुरू केली जाईल.

दरम्यान, या प्रकरणाने राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ माजवली आहे. कारण अमेडिया कंपनीचे संबंध पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील यांच्याशी जोडले जात आहेत. या कंपनीमार्फत ४० एकर जमिनीचा व्यवहार करण्यात आला होता, जो सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात अडकलेला आहे. आता स्टॅम्प ड्युटी वसुलीची कारवाई सुरू झाल्याने प्रकरणाला नवीन कलाटणी मिळाली आहे.

महसूल विभागाच्या सूत्रांच्या माहितीनुसार, स्टॅम्प ड्युटी भरण्यासाठी दिलेली ही मुदत ही अंतिम संधी आहे. या कालावधीत कंपनीने ठराविक रक्कम भरली नाही, तर जमिनीवर थेट सरकारी ताबा घेतला जाईल. तसेच भविष्यात कंपनीविरोधात आर्थिक गुन्हे शाखेमार्फत स्वतंत्र चौकशीही सुरू होऊ शकते. त्यामुळे पुढील काही दिवसांत या प्रकरणात नवे खुलासे होण्याची शक्यता आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून कोटी रुपये किंमतीची जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी करण्यात आली. या व्यवहारामुळे शासनाची सुमारे १५२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे या व्यवहारात केवळ ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क भरले गेले.

# पत्रकारांनी एआय जनरेटेड कंटेंट वापरताना पडताळणी करणे आवश्यक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :** एआय-जनरेटेड कंटेंटची पडताळणी आता आवश्यक असून डीपफेक तपासासाठी आता १५-२० पॅरामीटर्सवर आधारित विशेष टूल्स तयार झाली आहेत. त्याचबरोबर, फॅक्ट-चेकिंग संस्थांही सर्व फॅक्ट्स पडताळत नाहीत. त्यामुळे पूर्वग्रह असू शकतो. ह्यएआयह्नमधील बायस हा आज जागतिक पातळीवरील मोठा प्रश्न आहे, असे मत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केले.



रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ तसेच मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालयात आयोजित वृत्तपत्र तसेच डिजिटल माध्यम पत्रकारांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, एआय हे सत्याचा स्रोत नाही. ते माहितीचे स्वरूप बदलू शकतात, सारांश देऊ शकतात, पण ते सत्य ठरवू शकत नाही.

नव्या पिढीचे टूल्स (उदा. रिअल-टाइम सर्च करणारी अक) अनेक स्रोतांमधून माहिती गोळा करून त्वरित सारांश देऊ शकतात. हे पत्रकारांना त्वरित संदर्भ देऊन रिपोर्टिंग सोपे करतात; परंतु या माहितीचे स्रोत तपासणे आवश्यक असल्याचेही त्यांनी आर्वजून सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे मिळालेल्या संदर्भांवर मानवी पडताळणी नसतानाही निष्कर्ष देणे धोकादायक ठरू शकते. म्हणूनच मानवी नियमन आणि पडताळणी अनिवार्य असावी, असे त्यांनी ठळकपणे नमूद केले.

संवेदनशील किंवा दस्तऐवजीकरण ऑनलाईन टूल्समध्ये अपलोड करण्यापूर्वी सतर्कतेची गरज असल्याचे मत व्यक्त करत प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले की, ऑनलाईन प्रश्न, अपलोड केलेली सामग्री आणि शोधमागील ट्रेस कायम राहतात आणि संबंधित कायदेशीर चौकशीत प्राप्त करण्यायोग्य असू शकतात. त्यामुळे गोपनीय माहिती शेअर करताना व्यवस्थात्मक व कायदेशीर बाबी समजून घेणे गरजेचे ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

एआय कधीकधी खोटे संदर्भ तयार करू शकते, त्यामुळे वैज्ञानिक किंवा कायदेशीर बाबींमध्ये एआय वर अवलंबून राहणे धोकादायक ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

# विवाहाचे आमिष दाखवून तिघींवर बलात्कार

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १२ :** विवाहाचे आमिष दाखवून ३ महिलांवर बलात्कार करण्यात आल्याच्या तीन वेगवेगळ्या घटना पुण्यात घडल्या. या प्रकरणी कोंढवा, हडपसर आणि सहकारनगर पोलिस ठाण्यात स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. याशिवाय येरवडा परिसरात विनयभंगाचा एक गुन्हाही नोंदवण्यात आला आहे.

याप्रकरणी अनिकेत राकेश निकाळजे याला अटक केली आहे. आरोपी निकाळजेने युवतीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वेळोवेळी बलात्कार केला.

हडपसर भागातही विवाहाचे आमिष दाखवून एका युवतीवर बलात्कार झाल्याची घटना घडली. अभिषेक सरक याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरकने युवतीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर बलात्कार केला, ज्यामुळे ती गर्भवती झाली. एपीआय हसीना शिकलगार या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# मध्य रेल्वेचे महाप्रबंधक विजय कुमार यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :** मध्य रेल्वेचे महाप्रबंधक (जनरल मॅनेजर) विजय कुमार यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. त्यांनी गेल्याच महिन्यात १ ऑक्टोबर रोजी मुंबई मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापक पदाचा पदभार स्वीकारला होता.

भारतीय रेल्वे यांत्रिक इंजिनिअर सेवेतील १९८५ च्या तुकडीचे अधिकारी असलेले विजय कुमार यांनी सेवेला सुरुवात केली होती. मध्य रेल्वेचा पदभार स्वीकारण्यापूर्वी ते चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स येथे महाव्यवस्थापक म्हणून कार्यरत होते.

प्राथमिक माहितीनुसार, झोपेत असतानाच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याचे सांगितले जात आहे. हृदयविकाराचा झटका आल्यानंतर त्यांना तातडीने मुंबईतील जसलोक रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# व्हॉईस ऑफ मीडियाचे उत्कृष्ट पदाधिकारी पुरस्कार जाहीर



गडचिरोली, जिल्हाध्यक्ष. व्यंकटेश दुडुमवर | जालना, जिल्हाध्यक्ष. राजेंद्र भालेराव | सातारा, जिल्हाध्यक्ष. अनिल करंदकर | ठाणे, जिल्हाध्यक्ष. मंगल डोंगरे | नंदुरबार, जिल्हाध्यक्ष. रमाकांत पाटील | सिंधुदुर्ग, जिल्हाध्यक्ष. रुपेश पाटील

■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. १२ :** व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या वतीने दिले जाणारे उत्कृष्ट जिल्हाध्यक्ष व तालुकाध्यक्ष पदाधिकारी पुरस्कार -२०२५ जाहीर झाले आहेत. व्यंकटेश धुडूमवार, राजेश भालेराव, रमाकांत पाटील, अनिल करंदकर, मंगल डोंगरे, रुपेश पाटील यांच्यासह दहा जणांची उत्कृष्ट पदाधिकारी म्हणून निवड झाली आहे.

संघटनेचे मुख्य संयोजक तथा संचालक गोरक्षनाथ मदने यांनी आज पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. जगातील ५६ देशांमध्ये कार्यरत आणि ४ लाख ७० हजार पत्रकार सदस्य संख्या असलेल्या व्हॉईस ऑफ मीडिया या जगातील क्रमांक एक पत्रकार संघटनेचे राज्य शिखर अधिवेशन येत्या १५ आणि १६ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथील इस्कॉन सभागृहात होत आहे. या अधिवेशनात निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा गौरव प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

## पंढरपूरच्या राज्य अधिवेशनात होणार सर्वांचा गौरव

या निवड प्रक्रियेत प्रत्येक विभागातून एक जिल्हाध्यक्ष आणि एक तालुकाध्यक्ष यांची उत्कृष्ट कायासाठी निवड करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्षांमध्ये व्यंकटेश धुडूमवार (गडचिरोली), राजेश भालेराव (जालना), रमाकांत पाटील (नंदुरबार), अनिल करंदकर (सातारा), मंगल डोंगरे (ठाणे), रुपेश पाटील (सिंधुदुर्ग) यांचा समावेश आहे. तर तालुकाध्यक्ष म्हणून राजू कापसे (रामटेक), गंगाधर ढवळे (नायगाव), उमेश काटे (अमळनेर), गणेश आवळे (मिरज) आणि भारत म्हात्रे (वसई) यांची निवड झाली आहे.

तसेच विंग स्तरावरही सन्मान जाहीर झाले असून महिला विंगमधून लक्ष्मी वाडेकर (बुलढाणा), साप्ताहिक विंगमधून जितेंद्र जोगड (चंद्रपूर), रेडिओ विंगमधून अनुप फुसके (सातारा) आणि डिजिटल विंगमधून वसंत खडसे (वाशीम) यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

या निवड प्रक्रियेत अजित कुंकुलोळ, कुमार कडलग, नरेंद्र देशमुख, अमोल मतकर, मिलिंद टोके, बापूराव पाटील, किशोर करंजेकर, वैशाली पाटील, रश्मी मारवाडी आणि किरण ठाकरे यांचा सहभाग होता. संघटनेचे राज्य फादर बॉडीचे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, महासचिव दिगंबर महाले, कार्याध्यक्ष विजय चोरडिया, मंगेश खाटीक, महिला विंगच्या प्रदेशाध्यक्ष रश्मी मारवाडी, रेडिओ विंगचे प्रदेशाध्यक्ष इर्षाद शेख, साप्ताहिक विंगचे प्रदेशाध्यक्ष वामन पाठक आणि अब्दुल कईम यांनी निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# डीआरआयचे ऑपरेशन बुलियन ब्लेझ १५ कोटींचे सोने,चांदी जप्त



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :** महसूल गुप्तचर संचालनालयाने पुन्हा एकदा मोठी कारवाई करत सोनं तस्करी करणाऱ्या मोठ्या रॅकेटचा पदार्फाश केला आहे. 'ऑपरेशन बुलियन ब्लेझ' या गुप्त मोहिमेअंतर्गत करण्यात आलेल्या या धडाकेबाज कारवाईत ११ जणांना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून ११.८८ किलो सोनं आणि ८.७२ किलो चांदी जप्त करण्यात आली आहे.

या सोन्याची बाजारातील किंमत सुमारे १५ कोटी रुपये आहे. डीआरआयच्या या कारवाईने मुंबईतील सोन्याच्या काळ्या बाजारावर मोठा धक्का बसला आहे.

ही टोळी परदेशातून सोनं तस्करी करून भारतात आणत होती आणि ते गुप्त वितळवणी केंद्रांमध्ये वितळवून स्थानिक बाजारपेठेत विक्री करत होती. ही बेकायदेशीर प्रक्रिया मोठ्या प्रमाणात चालू असल्याची गुप्त माहिती अधिकाऱ्यांना मिळाल्यानंतर त्यांनी ऑपरेशन बुलियन ब्लेझ सुरू केलं. १० नोव्हेंबर रोजी मुंबईतील चार ठिकाणी एकाच वेळी छापेमारी करण्यात आली. यामध्ये दोन गुप्त भट्ट्या आणि दोन अवैध सोन्याची दुकाने आढळून आली.

दोन्ही भट्ट्या कार्यरत अवस्थेत सापडल्या असून वितळवणीसाठी आवश्यक सर्व उपकरणे तेथे होती. तात्काळ कारवाई करत उअक पथकाने तेथील ऑपरेटरना ताब्यात घेतले आणि ६.३५ किलो सोनं जप्त केले.

यानंतर दुसऱ्या टप्प्यात, या तस्करी केलेल्या सोन्याच्या विक्रीसाठी वापरल्या जाणाऱ्या दोन दुकानांवर छापे टाकण्यात आले. त्यापैकी एका दुकानातून ५.५३ किलो सोन्याचे बार जप्त करण्यात आले. सर्व मिळून डीआरआयने ११.८८ किलो सोनं आणि ८.७२ किलो चांदी जप्त केली.

या कारवाईतून सुमारे १५ कोटी रुपयांचा माल जप्त झाला असून, तो कस्टम्स ॲक्ट, १९६२ अंतर्गत जप्त करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात हे स्पष्ट झाले आहे की, हे सोनं थेट परदेशातून तस्करी करून भारतात आणले जात होते आणि त्याची बेकायदेशीर विक्री करून सरकारी महसूल फसविण्याचा प्रयत्न केला जात होता.

या संपूर्ण कारवाईत डीआरआयने आतापर्यंत ११ आरोपींना अटक केली आहे. त्यामध्ये रॅकेटचा मास्टरमाइंड, त्याचे वडील, व्यवस्थापक, चार वितळवणी कामगार, तस्करीच्या सोन्याचा हिशोब ठेवणारा अकाउंटंट आणि तीन वितरण कर्मचारी यांचा समावेश आहे.

या सर्वांना मुंबईतील दंडाधिकारी न्यायालयासमोर हजर करण्यात आलं असून, न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. उअकच्या सूत्रांच्या माहितीनुसार, आरोपींनी सोनं तस्करी करून भारतीय आयात धोरणांचे उल्लंघन केले आणि केंद्र सरकारच्या महसूलात मोठ्या प्रमाणावर तोटा केला.

दरम्यान, या कारवाईनंतर डीआरआयने या प्रकरणाचा अधिक खोलवर तपास सुरू केला आहे. या सोनं तस्करी रॅकेटचा विस्तार फक्त मुंबईपुरता मर्यादित नसून, देशातील इतर मोठ्या शहरांपर्यंत पसरलेला असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या तस्करीच्या साखळीत आणखी काही व्यापारी, वितरक आणि सोन्याचे बेकायदेशीर विक्रेते सहभागी असल्याची माहिती समोर येत आहे. पुढील काही दिवसांत या प्रकरणात आणखी अटक आणि जप्तीची शक्यता आहे.

# तंत्रज्ञानाच्या नव्या युगात एआयचा वाढता प्रभाव

■ **महासागर प्रतिनिधी,मुंबई, दि. १२ :** एआय म्हणजे केवळ संगणकाचा वापर नव्हे, तर मानवी मेंदूच्या विचारसरणीचे तंत्रज्ञानरूप आहे. एआयचा वापर कौशल्यपूर्ण केला तर अधिक सुलभपणे काम करता येऊ शकते, असे मत कृत्रिम बुद्धिमत्ता तज्ज्ञ किशोर जस्मानी यांनी व्यक्त केले.



मंत्रालय येथे रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालयात वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक व डिजिटल प्रसार माध्यमांसाठी चार दिवसीय कृत्रिम बुद्धिमत्ता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत 'डिजिटल कन्टेंट क्रिएशन इन द एज जनरेटिव्ह एआय' या विषयावर कृत्रिम बुद्धिमत्ता तज्ज्ञ किशोर जस्मानी बोलत होते. यावेळी रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, सरचिटणीस दिपक भातुसे यासह पत्रकार उपस्थित होते.

कृत्रिम बुद्धिमत्ता तज्ज्ञ किशोर जस्मानी म्हणाले की, १९५६ मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता या संकल्पनेचा जन्म झाला आणि तेव्हापासून मशीन शिकत होती, पण गेल्या दशकात ती समजायला आणि निर्णय घ्यायला शिकली आहे. एआयला आपण दिलेल्या प्रचंड प्रमाणातील माहितीवरून ती शिकते. लाखो पुस्तके, कोट्यवधी लेख आणि डिजिटल डेटातून ती ज्ञान घेत असते.

उदाहरणार्थ, काही एआय मॉडेल दररोज १ कोटींपेक्षा अधिक लेख वाचतात आणि त्यावरून उत्तरं तयार करतात.

एआयला जेवढी अचूक माहिती दिली जाईल, तेवढे अचूक परिणाम ती देते. म्हणजेच मानव जितका सजग, एआय तितकी हुशार होतात. एआयचा वापर - आपल्या रोजच्या जीवनात आज आपण वापरत असलेले बहुतेक डिजिटल प्लॅटफॉर्म्स एआयवर आधारित आहेत.

कृत्रिम बुद्धिमत्ता तज्ज्ञ किशोर जस्मानी म्हणाले की, तुमच्या खरेदीच्या सवयींवरून डिजिटल प्लॅटफॉर्म तुम्हाला त्या वस्तू सुचवतात. ॲलेक्सा व सिरी हे देखील त्याच प्रकारे काम करतात. हेल्थकेअर, बँकिंग व फायनान्स, शिक्षण, सादरीकरण, ड्रायव्हरलेस कार्स ही त्याची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. ए आय हा मानवाचा पर्याय नाही, तर सहकारी आहे.

एआयच्या वाढत्या वापरामुळे अनेकांना नोकऱ्या जाण्याची भीती वाटते. एआय हा मानवाचा प्रतिस्पर्धी नव्हे, तर त्याचा सहाय्यक आहे. जो एआयला योग्यरित्या समजून घेईल, वापर शिकेल, तो आपल्या कामात अधिक कार्यक्षम आणि यशस्वी ठरेल, असेही त्यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना सांगितले.

# विद्यार्थ्यांनीचा विनयभंग करणाऱ्या शिक्षकाला गावकऱ्यांनी दिला चोप,पोलिसानी केली अटक

**पातूर :** पातूर तालुक्यातील चान्नी पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या अकोला जिल्ह्यातील ग्राम नवेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील एका शिक्षकाने पाच अल्पवयीन विद्यार्थिनींचा विनयभंग केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी शिक्षक सुधाकर पांडे यास अटक केली असून, पुढील तपास चान्नी पोलिस करत आहेत. प्राप्त माहितीनुसार, आरोपी शिक्षकाने जि. प. शाळेत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलींसोबत गेल्या काही दिवसांपासून गैरवर्तन केले होते. पीडित विद्यार्थिनींपैकी एका मुलीने धैर्य दाखवत घरी जाऊन हा प्रकार पालकांना सांगितला. संतप्त पालकांनी तत्काळ पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपी शिक्षकाला ताब्यात घेतले. चान्नी पोलिस ठाण्याचे अधिकारी या प्रकरणाचा पुढील तपास करीत असून, घटनेमुळे शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.या घटनेनंतर आरोपी शिक्षकाला संतप्त ग्रामस्थांनी चोप दिल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या घटनेमुळे शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली असून, शाळेत आणि परिसरात सुरक्षा वाढविण्याची मागणी होत आहे. नवेगावसह परिसरातील पालक आणि नागरिक संतप्त झाले आहेत. शिक्षक विद्यार्थ्यांसाठी आदर्श असतो, परंतु अशा विकृत प्रवृत्तीला समाजात स्थान नाही. संबंधित आरोपीवर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी समोर आली आहे.

## थोडक्यात

### भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना अर्ज करण्याचे आवाहन

**अकोला :** शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र मात्र, विद्यार्थी क्षमतेअभावी प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील इयत्ता ११ वी, १२ वी, तसेच त्यापुढील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेता यावे यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबवली जाते. पात्र विद्यार्थ्यांनी ३० नोव्हेंबरपूर्वी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. योजनेद्वारे विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम त्यांच्या खात्यामध्ये थेट जमा करण्यात येते. विभागाच्या होस्टेल मॅनेजमेंट सिस्टीम (https://hmasscrutinyworkflow.mahait.org) संकेतस्थळावर दि. ३० नोव्हेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करावा. विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षात वसतिगृहासाठी अर्ज केलेला असणे आवश्यक आहे. प्रवेश क्षमतेअभावी वसतीगृहात प्रवेश न मिळालेले विद्यार्थी स्वाधार योजनेकरिता पात्र असतील. तालुका स्तरावरही स्वाधार योजना लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे मुख्यत्वे तालुक्याचे ठिकाणी महाविद्यालय असलेल्या व तेथे प्रवेशित तालुक्यातील विद्यार्थी सुध्दा या योजनेचा लाभ घेऊ शकतात. अपवाद - विद्यार्थी स्थानिक रहिवासी नसावा. अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त मारोती वाठ यांनी केले आहे.

### तेल्हारा शहरात आधार केंद्राचा अभाव

**तेल्हारा :** शहरात केवळ एकच आधार केंद्र असल्यामुळे नागरिकांना दिवसभर तुफान गर्दी, लांबच लांब रांगा आणि कामासाठी तासनतास प्रतीक्षा या त्रासांना सामोरे जावे लागत आहे. आधार कार्ड नोंदणी, मोबाइल क्रमांक अद्ययावत करणे, पत्ता दुरुस्ती, किंवा नवीन नोंदणी अशा कामांसाठी नागरिकांना वारंवार चकरा माराव्या लागत आहेत.

## मेळघाटचे वनवैभव, आदिम संस्कृतीचे घडणार दर्शन

# महोत्सवात दर्जेदार कार्यक्रमांचे नियोजन करावे

### जानेवारीअखेरीस नरनाळा महोत्सव

### - जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे यंत्रणांना निर्देश

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

सातपुड्यात वसलेल्या मेळघाटचे वनवैभव, आदिम संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी जिल्ह्यात नरनाळा महोत्सव दि. ३० जानेवारी ते दि. १ फेब्रुवारी दरम्यान घेण्याचे नियोजन असून, त्या दृष्टीने सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.

महोत्सवाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने संबंधित यंत्रणांची ऑनलाईन बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, अकोटचे उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर व इतर अधिकारी उपस्थित होते.पर्यटक, निसर्गमित्र व वनप्रेमींच्या जिव्हाळ्याचा विषय असलेला नरनाळा पर्यटन महोत्सव १३ वर्षांनंतर पुन्हा आयोजित करण्यात येत आहे. मेळघाटचे समृद्ध वनवैभव, ऐतिहासिक नरनाळा



किल्ला, आदिम संस्कृती व परंपरांचे दर्शन महोत्सवातून घडेल. महोत्सवात नौकाविहार, सफारी, आदिवासी नृत्यकला सादरीकरण, पक्षीनिरीक्षण, गड भटकंती, साहसी खेळ, छायाचित्र प्रदर्शन याबरोबरच अनेकविध सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन केले जाणार आहे.

महोत्सवाच्या अनुषंगाने जागा निश्चिती, तसेच परिपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करून तसा प्रस्ताव तत्काळ पाठवावा. दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश करावा. स्थानिक कलावंतांनाही प्रोत्साहन देण्यात येईल. महसूल, वनविभाग, पाटबंधारे विभाग यासह सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने महोत्सव यशस्वी करावा. स्वयंसेवी संघटनांचा सहभाग मिळवावा. महोत्सवाची माहिती सर्वदूर पोहोचण्यासाठी व्हिडीओ, माहितीपट, बातम्या, फलक आदींद्वारे सर्वदूर प्रसिद्धी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी यावेळी दिले.

# ‘अमृत दुर्गोत्सव’ची विश्वविक्रमाला गवसणी

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनीतर्फे (अमृत) दिवाळीत ''अमृत दुर्गोत्सव २०२५' हा एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. प्रचंड प्रतिसाद मिळाल्याने या उपक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे.महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम, संस्कृती रक्षण, स्वभाषा, स्वधर्म यासारख्या अनेक गुणांना उजाळा देऊन अनेकांच्या मनावर सुसंस्कार करणे, या दृष्टीने समाजमन घडविणे आणि शिवाजी महाराजांना विश्वविक्रमी मानवंदना देणे हे उद्दिष्ट होते.

महाराजांच्या पराक्रमाची साक्ष असलेले आणि युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केलेल्या बारा गडांपैकी कोणत्याही एकाची प्रतिकृती अंगणात, सोसायटी, शाळेत, मैदानात तयार करून त्यासोबत फोटो घेऊन तो संकेतस्थळावर करणे असे स्वरूप होते. सहभागींना मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीचे अभिनंदन पत्र मिळणार होते. अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम व्यापक झाला.

महाराष्ट्रभूमीबरोबरच अमेरिका, इंग्लंड, आखाती देशातून प्रतिसाद मिळाला. या प्रचंड प्रतिसादाची नोंद 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' या विश्वविक्रमांची नोंदणी करणाऱ्या संस्थेने घेतली. 'मानवी हातांनी तयार केलेल्या प्रतिकृतींचा सर्वात मोठा डिजिटल फोटो अल्बम' या श्रेणीमध्ये 'अमृत दुर्गोत्सवात' विश्वविक्रम झाल्याचे प्रमाणपत्र गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' चे प्रतिनिधी प्रवीण पटेल यांच्या हस्ते अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांना सुपूर्द केले. सुयोग्य चित्रे निवडणे, अस्पष्ट व दुबार चित्रांना बाद करणे आदी अनेक दिवस चाललेल्या अतिशय क्लिष्ट प्रक्रियेतून जाऊन विश्वविक्रम प्रस्थापित होऊ शकला याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

# दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या संस्थांना नोंदणी अनिवार्य

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

दिव्यांगांसाठी काम करणा-या संस्थांना नोंदणी अनिवार्य असून, त्यांनी ती ३० नोव्हेंबरपूर्वी पूर्ण करून घेण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी केले. दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ नुसार दिव्यांग कल्याण क्षेत्रात काम करणा-या संस्थांना नोंदणी आवश्यक आहे. दिव्यांग



व्यक्ती हक्क अधिनियम २००० नुसार दिव्यांग कल्याण आयुक्तांना सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात आले असून, त्यांच्यामार्फत नोंदणी प्रमाणपत्र मिळते. इच्छूक संस्थांनी नोंदणी प्रस्ताव दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, अकोला यांच्याकडे दि. ३० नोव्हेंबरपूर्वी सादर करावा. विनानोंदणी संस्थांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे श्री. जाधव यांनी सांगितले.

## आदर्श आचार संहिता अंमलबजावणी स्थिर

# पथका कडून रोख रक्कम जप्त

**▪मुर्तिजापुर,दि १२ (प्रतिनिधी) :**

मुर्तिजापूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता आदर्श आचार संहितेचे प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने स्थाई पथक (डडढ पथक )गठीत करण्यात



आले आहे. मा. राज्य निवडणूक आयोगाने दि. ०४/११/२०२५ ला नगर परिषद सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम घोषीत केला असून त्या अनुषंगाने तात्काळ प्रभावाने आदर्श आचार संहिता लागू झालेली आहे. आज दिनांक १२/११/२०२५ रोजी सकाळी ७.१० वाजता स्थिर सर्वेक्षण पथक क्रमांक ४ आसरा फाटा नॅशनल हायवे मुर्तिजापूर यांनी वाहन क्र . चक ३१ उठ ८६१९ वाहन चालक योगेश अनिल कनोजे यांच्या कडून रु. २,३०,३००/- रोख रक्कम जप्त केली. सदर कार्यवाही ही पथक प्रमुख चंदू महादेव तायडे व त्यांचे पथकातील इतर सर्व कर्मचारी यांनी केली. याबाबत सदर रक्कम ही कशाबाबत व कुठून आणली याबाबत वाहन चालकाने पुरावे सादर न केल्यामुळे सदर रक्कम स्थिर सर्वेक्षण पथकाने पंचनामा अहवाल करून जप्त केली असून पुढील कार्यवाही मा . निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नियंत्रण अधिकारी निलेश जाधव यांचे मार्गदर्शना खाली नोडल अधिकारी प्रसाद राठोड, वैभव ओहेकर, राजेश भुगुल आदर्श आचार संहिता अंमलबजावणी समिती हे करीत आहेत.

# अवैध गावठी दारू विक्री व निर्माण करणाऱ्या ठिकाणांवर कारवाई

### ७६ केसेस व ७,५२,२२५ रु चा मुद्देमाल जप्त

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

अकोला पोलीस दलामार्फत जिल्ह्यातील अवैध गावठी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यां विरुद्ध 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत विशेष मोहीम राबविण्यात आली. मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १०.११.२०२५ व दिनांक ११.११.२०२५ दोन दिवस सकाळी १२ ते रात्री १२ वाजेपर्यंत ही मोहीम प्रभावीपणे पार पडली. या विशेष मोहिमेत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांतील पोलीस पथकांनी एकूण ७५ ठिकाणी कारवाई केली आहे. कारवाईदरम्यान सुमारे ७,३६,४२५/- रुपये किमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला, तर अवैध धंद्यात सामील असलेल्यांवर आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. तसेच, स्थानिक गुन्हे शाखेने स्वतंत्रपणे ०१ ठिकाणी छापा टाकत अवैध दारू विक्री व निर्माण करणाऱ्या ठिकाणांवर धडक देवुन लिटर गावठी दारू ०५ लिटर व १०० लिटर सडवा मोहमाच एकुण किंमत १६०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अशा प्रकारे अकोला जिल्हा पोलिसांनी एकूण ७,५४, २२५/- रुपयांच्या अवैध दारू साहित्यावर कारवाई केली आहे.अवैध गावठी दारू उत्पादनामुळे जनतेच्या आरोग्याला गंभीर धोका



निर्माण होवुन व शांतता भंग होते. या पार्श्वभूमीवर अकोला पोलिस दलाने अशा अवैध धंद्यावर कठोर कारवाई करताना जनतेचा विश्वास कायम ठेवला आहे. पुढील काळात अशा प्रकारच्या अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी या पुढे सुध्दा नेहमी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने कळिवले आहे.अवैध दारू विरोधातील ही मोहीम सुरूच राहणार असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या बेकायदेशीर अवैध दारू विक्री व निर्माण करणाऱ्यां विषयी माहिती असल्यास जवळच्या पोलीस ठाण्यात कळवावे, असे आवाहन अकोला पोलीस दलाकडून करण्यात येत आहे.

# वाहेगुरू सेवा समितीची श्री गुरु नानक जयंती

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

वाहेगुरू सेवा समितीच्या वतीने श्री गुरु नानक देव जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या उत्सवात सकाळी प्रभात फेरी सिंधी कॅम्प येथील एस एस डी धाम येथून सुरू होऊन राजा एसटीडी चौक, पाटील दूध डेअरी, झूलेलाल वाटिका, मनवाणी चौक, संत गोदडीवाला धाम, मोटवानी गल्ली, प्रेम प्रकाश आश्रम, नारायण दूध डेअरी, अलसी प्लाट मार्गे नानक नगर नीमवाडी येथे या फेरीचे अल्पोपहार ने समापन झाले. व्यवस्था लख्मीचंद कटारिया, खेमचंद आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली.प्रभात फेरीदरम्यान विविध ठिकाणी अनेक कुटुंबांनी आरती आणि अरदास केली. आरती- अरदास सेवेची जबाबदारी राजू बाबा रेलु सिंघाणी व परिवाराने घेतली.दुपारी गुरुचा लंगरप्रसाद ठेवण्यात आला होता.यावेळी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या हस्ते आरती करण्यात आली आणि त्यानंतर लंगर प्रसादाची सुरुवात



झाली. हजारो नागरिकांनी या लंगर प्रसादाचा लाभ घेतला.या आयोजनाच्या यशस्वीतेसाठी वाहेगुरू सेवा समितीचे अध्यक्ष हरीश पारवाणी, कोडूमल चावला, गोपालदास कटारिया, भगतराम देवाणी, अशोक मनवाणी, अशोक बोधानी, राहुल मुलानी, जय हेमरानी, गुरदास परवाणी, सुशील परवाणी, कमल सतनानी, महेश खानचंदानी, घनश्याम शोधनानी, प्रकाश मनवाणी, मोहन नागवानी, निर्मल भाटिया समवेत समाजातील इतर बंधू-भगिनींचे मोलाचे सहकार्य लाभले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी

# भाजपाच्या ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर

### आमदार सावरकर यांचा समावेश

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

राज्यात होणाऱ्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी तर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, ज्येष्ठ नेते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, ज्येष्ठ नेते खा. नारायण राणे, आमदार व भाजपा प्रदेश सरचिटणीस विधिमंडळ प्रतोद आमदार रणधीर सावरकर , आमदार डॉक्टर संजय कुटे, सह ४० नेते प्रचार करणार आहेत. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या निवडणुकीसाठी पक्षाच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे.

आमदार रणधीर सावरकर संघटन कौशल्य आणि विकासाचा सर्व स्पर्शी नेतृत्व असल्यामुळे पक्ष त्यांची निवड केली आहे या निवडीमुळे अकोला जिल्ह्याच्या भाजपाचा गौरव झाला असून कार्यकर्त्यांचा सन्मान सोबत प्रदेश स्तरावर अकोल्याचा डंका वाजणार आहे आमदार रणधीर सावरकर यांच्या निवडीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

# रेल्वे ब्रॉडगेज प्रकल्पाला वेग

### अकोट अडगाव मार्गावर काम सुरु; २०२७ पर्यंत प्रकल्प पूर्ण होणार

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

अकोला-खंडवा या महत्त्वाच्या रेल्वे मार्गाच्या ब्रॉडगेज प्रकल्पाला गती मिळाली असून, खासदार अनुप धोत्रे यांच्या प्रयत्नांमुळे अकोट-अडगावदरम्यान मार्गावरील काम जोरात सुरू झाले आहे. लवकरच हिवरखेड अडगाव तसेच आमला खुर्द-तुकाईखेड़ या टप्प्यांवरील कामालाही प्रारंभ होणार आहे. संपूर्ण प्रकल्प २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

अकोला-अकोट रेल्वे मार्गाचे विद्युतीकरणाचे कामही सुरू असून, लवकरच अडगाव स्टेशन ब्रॉडगेज प्रणालीत समाविष्ट होणार आहे. या प्रकल्पामुळे ग्रामीण व आदिवासी भागांना थेट रेल्वे नेटवर्कशी जोडले जाणार असून, विकासाच्या दृष्टीने हा पट्टा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. हा रेल्वे मार्ग राज्याच्या पश्चिम व पूर्व भागांना जोडणारा दुवा ठरेल. तत्कालीन केंद्रीय मंत्री संजय धोत्रे यांच्या कार्यकाळात अकोला-अकोट रेल्वे मार्ग पूर्ण झाला होता. तथापि, नंतर काही कायदेशीर अडचणींमुळे प्रकल्पाचे काम काही काळ थांबले होते. खासदार धोत्रे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून या प्रकल्पासाठी विशेष निधी मिळवला आहे. खंडवा - ओंकारेश्वर महू या मार्गावरील रस्त्याचे कामही सुरू असून, हिवरखेड- तुकाईखेड या विभागाचे भूमी अधिग्रहण पूर्ण झाल्यानंतर कामाला वेग येणार आहे. अडगाव बु. रेल्वे स्टेशनच्या कामालाही गती देण्यात आली असून, दक्षिण मध्य रेल्वे व रेल्वे मंत्रालयाशी खासदार धोत्रे सतत संपर्कात आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळे अकोट - अकोला रेल्वे विद्युतीकरणानंतर अडगाव हिवरखेड मार्गावरही लवकरच रेल्वेसेवा सुरू होणार आहे.

# डॉ.संतोषकुमार कोरपे यांचा मराठा पाटील संघटनेचे वतीने सत्कार संपन्न

**▪अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. संतोष कुमार कोरपे यांना महाराष्ट्र राज्य बँक असोसिएशनचा जीवनगौरव पुरस्कार व अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला जिल्हा सहकारी बँकांची शिखर बँक राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक अर्थात नाबार्डचा उत्कृष्ट जिल्हा सहकारी बँक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल मराठा पाटील संघटनेच्या वतीने शाल पुष्पगुच्छ श्रीफळ व सहकार तपस्वी पदवी बहाल करणारे सन्मानपत्र देऊन मराठा पाटील संघटनेचे मार्गदर्शक सेवकरामजी ताथोड, संदीप पाटील, अशोक पटोकार, संघटनेचे अध्यक्ष शरद वानखडे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी बाळापुर मतदार संघाचे आमदार नितीन देशमुख,अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष रमेश हिंगणकर डॉ. सुभाष चंद्र कोरपे, कृषी उत्पन्न बाजार समिती अकोला चे सभापती बँकेचे संचालक शिरीष धोत्रे,बँकेचे संचालक राजेश राऊत, जगदीश पाचपोर, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य संघटनेचे कार्यकारणी सदस्य धनंजय नेमाडे, रुपेश पटोकार, देवानंद साबळे, विठ्ठलराव पाटील माळी,गणेश मुरूमकर, मधुसूदन टिकार, दत्ता पाटील मांगटे,योगेश्वर वानखडे, पुरुषोत्तम मांगटे, ज्ञानेश्वर माळी, मंचितराव पोहरे प्रामुख्याने उपस्थित होते. अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उरळ बु शाखेच्या इमारत उद्घाटन प्रसंगी आयोजित कार्यक्रमात सत्काराला उत्तर देताना डॉक्टर संतोष कुमार कोरपे म्हणाले प्रत्येक समाजातील उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तीच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्याकरिता अशा व्यक्तींचा सत्कार करणे सन्मान करणे त्यांचे कार्याची दखल घेऊन गौरव करणे हे समाजाचे कर्तव्यच आहे. मात्र उत्तम काम करणारा कोणत्याही समाजाचा असेल त्याचाही गौरव मराठा पाटील संघटने करावा. अशा सत्कारातून आणि समाजाने केलेल्या कौतुकामुळे काम करणाऱ्याला ऊर्जा मिळते, प्रेरणा मिळते आणि अधिक काम करण्यास स्फूर्ती प्राप्त होते.

मराठा पाटील संघटने च्या कार्यकर्त्यांनी समाज उपयोगी कार्य करून समाजाची प्रगती होण्यास अधिक कार्य करावे असे आवाहन पुढे बोलताना डॉक्टर कोरपे यांनी केले कार्यक्रमास उरळ परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

SIMPLEX MILLS CO. LTD.

**सिम्प्लेक्स मिल्स कंपनी लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय : शिवनी गाव, तालुका व जिल्हा - अकोला - ४४४१०४
कॉर्पोरेट ऑफिसः ३०, केशवराव खाड्ये मार्ग, संत गाडगे महाराज चौक, महालक्ष्मी (पु) मुंबई: ०२९-२९४ ५१
Tel No:+91 22 2308 2951 Website : www.simplex-group.com
E-mail : mills@simplex-group.com CIN-L65900MH1998PLC116585

**३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध्या वर्षाच्या स्वतंत्र अनधिकृत आर्थिक निकालांचा उतारा**

(प्रति शेअर कमाई वगळता लाखांमध्ये)

| अ. क्र | विशेष | क्वार्टर संपले ३०.०९.२०२५ (अलेखापरीक्षण केलेले) | अर्धा वर्ष संपले ३०.०९.२०२५ (अलेखापरीक्षण केलेले) | तिमाही संपली ३०.०९.२०२४ (अलेखापरीक्षण केलेले) |
|---|---|---|---|---|
| 1 | ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न | 6.30 | 6.30 | 3.03 |
| 2 | निव्वळ नफा/ (तोटा) कालावधीसाठी (कर आधी आणि अपवादात्मक वस्तू) | (2.09) | (4.10) | (1.20) |
| 3 | करपूर्वीच्या कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक वस्तूंनंतर) | (2.09) | (4.10) | (1.20) |
| 4 | करानंतरच्या कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक वस्तूंनंतर) | (2.09) | (4.10) | (1.20) |
| 5 | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न या कालावधीसाठी (करानंतर) नफा/ (तोटा) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करानंतर) | (2.09) | (4.10) | (1.20) |
| 6 | इक्विटी शेअर कॅपिटल | 300.04 | 300.04 | 300.04 |
| 7 | प्रति शेअर कमाई (प्रत्येकी १,०००/-) (चालू आणि बंद केलेल्या ऑपरेशन्ससाठी)- (वार्षिकीकृत नाही) मूलभूत आणि सौम्य | (6.97) | (13.68) | (4.01) |

टिपा:

१ वरील एसईबीआय (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमावली, २०१५ च्या नियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजमध्ये दाखल केलेल्या तिमाही आणि वर्ष संपलेल्या आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा एक उतारा आहे. आर्थिक परिणामांचे संपूर्ण स्वरूप येथे उपलब्ध आहे. स्टॉक एक्सचेंजची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.simplex-group.com.

२ वरील निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहे आणि संचालक मंडळाने १२ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत मान्यता दिली आहे.

३ वरील आर्थिक परिणाम कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अन्वये विहित केलेल्या कंपनी (भारतीय लेखा मानके) नियम, २०१५ (इंड एएस) नुसार तयार केले गेले आहेत आणि इतर मान्यताप्राप्त लेखा पद्धती आणि धोरणे लागू आहेत.

ठिकाण: मुंबई
तारीख: १२ नोव्हेंबर २०२५

सिम्प्लेक्स मिल्स कंपनी लिमिटेड
एसडी/-
शेखर आर सिंग
अध्यक्ष
डीआयएन-०३३५७२८१

### जमिनी मूळ वतनधारकांना परत द्या

**अकोला :** पुणे जिल्ह्यातील शासकीय जमीन गैरव्यवहार प्रकरण गाजत असतानाच महार आता अकोल्यात वतन, इमानी वतन जमिनी या मूळ वतनधारकांना परत द्या, अशी मागणी करीत मंगळवारी भीमशक्ती सामाजिक संघटना व अशोक प्रतिष्ठानने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. ही मागणी पूर्ण न झाल्यास थेट राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत निवेदन सादर करण्यात आले.

## मुर्तिजापूरात निवडणूक निरीक्षकांचा पाहणी दौरा

**■मुर्तिजापुर,दि १२ (प्रतिनिधी) :** आगामी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी मा. निवडणूक निरीक्षक तथा अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांनी मुर्तिजापूर नगर परिषद येथे भेट देऊन निवडणूक पूर्वतयारींची सखोल पाहणी केली.

मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार शिल्पा बोबडे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी नीलेश जाधव, तसेच शहर पोलिस निरीक्षक अजित जाधव उपस्थित होते.निरीक्षक गायकवाड यांनी स्ट्राँग रूम,



मतमोजणी कक्ष व इतर संवेदनशील ठिकाणांची पाहणी करून निवडणूक तयारीबाबत समाधान व्यक्त केले. त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांशी कायदा-सुव्यवस्था, आदर्श आचारसंहिता पालन व इतर महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली.

### अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ

## अद्ययावतीकरणामुळे योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी अफवांवर विश्वास ठेवू नका

**- व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख**

**■अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे कामकाज बंद झाल्याच्या व व्याज परतावा थांबविण्यात आल्याच्या अफवा काही समाजकंटकांकडून समाजमाध्यमांतून पसरवल्या जात आहेत. त्यात कोणतेही तथ्य नसून, महामंडळाचे नवीन पात्रता प्रमाणपत्र देण्याचे काम वगळता इतर सर्व कामकाज सुरळीतपणे सुरु आहेत, असे स्पष्टीकरण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी केले आहे.महामंडळाच्या सर्व योजना नियमित सुरू आहेत. त्याचप्रमाणे, वेब प्रणालीचे अद्ययावतीकरण सुरू असून सेवा १५ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत देण्याचे बंधन महामंडळाने स्वत: वर घालून घेतले आहे. याबाबत आवश्यक ते बदल वेब प्रणालीमध्ये करणे सुरु आहे. एजंटमार्फत लाभार्थ्यांची होणारी आर्थिक पिळवणूक थांबावी यासाठी म्हणून महामंडळाने सामाईक सेवा केंद्रांद्वारे फक्त ७० रुपयांत सेवा उपलब्ध करण्यात येत आहेत. मोबाईल ॲप्लिकेशनही विकसित होत आहे. एजंटमार्फत लाभार्थ्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्याने, सद्य:स्थितीत नाशिक व अहमदनगरमध्ये संबंधितांवर फौजदारी गुन्हे नोंदवले आहेत. असे प्रकार घडू नयेत यासाठी वेब प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करण्याचे काम सुरु आहे. अद्ययावतीकरणामुळे लाभार्थ्यांना सुरळीत व सहजपणे व्याज परतावा मिळणार आहे. यापूर्वी व्याज परताव्याकामी लाभार्थ्यांना एका वेळेस कमाल ३ क्लेम सादर करता येत होते. मात्र सद्यस्थितीत लाभार्थ्यांना एका वेळेस कमाल ६ क्लेम सादर करता येत आहेत. त्याशिवाय, ऑनलाईन परिपूर्ण माहिती, ऑनलाईन प्रशिक्षण उपलब्ध आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या राजकीय, दिशाभूल करणाऱ्या किंवा अफवांवर आधारीत माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन श्री. देशमुख यांनी केले.

## निवृत्तीवेतनधारकांनी हयातीचा दाखला सादर करावा

### कोषागाराचे आवाहन

**अकोला :** जिल्हा कोषागारामार्फत निवृत्तीवेतन घेणा-या सर्व निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारक, माजी आमदार तसेच इतर सर्व राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारकांनी नोव्हेंबर महिन्यात त्यांच्या बँकेत जाऊन विहीत नमुन्यात हयात प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करावी, असे आवाहन जिल्हा कोषागाराने केले आहे.पेन्शनरांच्या संबंधित बँकेत विहीत नमुन्यातील हयात प्रमाणपत्र यादी उपलब्ध आहे. सर्व राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारकांनी उपलब्ध यादीमध्ये आधारकार्ड क्रमांक, पॅन कार्ड क्रमांक, दुरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे अनिवार्य आहे. त्याशिवाय डिसेंबर २०२५ चे निवृत्तीवेतन देय होणार नाही.ज्या निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना वयाची ८० वर्षे पूर्ण झाले आहेत व निवृत्तीवेतनात २० टक्के व अधिक वाढ मिळाली नाही, त्यांनी तत्काळ जन्म दाखला, पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र, पारपत्र, बँकखाते असलेल्या बँक शाखा प्रमुखांचे प्रमाणपत्र, शासकीय,निमशासकीय आस्थापनेचे प्रमाणपत्र, सेवापुस्तकातील नोंद,ओळखपत्र, सेवानिवृत्त झालेल्या कार्यालय प्रमुखांचे प्रमाणपत्र, वाहन परवाना, भारतीय जीवन विमा कंपनी अथवा अन्य विमा कंपनी यांच्याकडील पॉलिसी आदी यापैकी एक पुरावा तसेच बँक पासबुकाची झेरॉक्स यासह निवृत्तीवेतन शाखा, कोषागार कार्यालय येथे अर्ज करावा, असे जिल्हा कोषागार अधिकारी मा.ब. झुंजारे यांनी कळिवले आहे.

## राणी सती धाम मध्ये छप्पन भोग उत्सव

**■अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :** लाखो भक्तांची तारणहार झुंझुनूची राणी सती दादी यांचा पावन प्रकटोत्सव बुधवारी जि प रोडवरील राणी सती धाम येथे मोठ्या भक्तीभावात संपन्न झाला.मंगसर बदीच्या या दोन दिवसीय उत्सवात बुधवारी सायंकाळी दादींचा उत्सव संपन्न होऊन यात भव्य ५६ भोग दर्शन उत्सव साकार करण्यात आला. यावेळी भव्य झाकी शृंगार करून दादीच्या पुढ्यात ५६ खाद्य पदार्थचा भोग ठेवून सामूहिक आरती करण्यात आली. यावेळी उपस्थित भक्तांना प्रसाद वितरित करण्यात आला. याचे यजमान सौ. अनध अग्रवाल आणि सौ.



श्रेया अग्रवाल (मुंबई) होते. आज गुरुवार दि १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यंत ५६ भोग दर्शन आणि जात पूजा होणार आहे. या दिवशीचे यजमान संजय पु. अग्रवाल असतील. दुपारी २ वाजता सुप्रसिद्ध गायिका चंदा तिवारी यांचा दादी मंगलपाठ कार्यक्रम होईल.उत्सवाचे बुंदीप्रसाद यजमान नंदकिशोर खेतान, राजेश अग्रवाल, फुल शृंगार यजमान मदनलाल तुलशान,आदिलाबाद, विद्युत रोषणाई यजमान डॉ. मनोज अग्रवाल अंदुरावाले, पंकज अग्रवाल, पानप्रसाद यजमान सपना गुप्ता,सारिका अग्रवाल असून उत्सवात राधाकृष्णांची सुंदर झाकी साकारण्यात आली आहे.या भव्य दादी प्रकटोत्सवाचा भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन राणी सती धामचे अध्यक्ष जगदीशप्रसाद बछुका यांनी केले.

## पुरवठा योजनांसाठी ९०.३४ दलघमी पाणी आरक्षण मंजूर

**■अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील प्रकल्पातून बिगर सिंचनअंतर्गत पाणी पुरवठा योजनांसाठी सन २०२५-२६ साठी शासन मंजूरीनुसार आरक्षण ७३.४३६ दलघमी इतके व आकस्मिक पाणी आरक्षण १६.९०४ दलघमी आहे. त्यानुसार जिल्हास्तरीय आकस्मिक पिण्याचे पाणी निश्चिती समितीकडून एकूण ९०.३४ दलघमी पाणी आरक्षण मंजूर करण्यात आले आहे.

अकोला शहरासाठी काटेपूर्णा प्रकल्पातून मंजूर आरक्षणाइतके २४.०३ दलघमी पाणी आरक्षित करण्यात आले आहे. त्याच प्रमाणे, काटेपूर्णा प्रकल्पातून महान मत्स्यबीज केंद्रासाठी ०.८६ दलघमी, तसेच ६० खेडी पाणीपुरवठा योजनेसाठी ५.०३ दलघमी, ४ खेडी पाणीपुरवठा योजनेसाठी १.९६, मूर्तिजापूर शहर पाणीपुरवठा योजनेसाठी ३.३५ दलघमी आणि म. औ. वि. महामंडळासाठी ०.७४ दलघमी पाणी आरक्षित आहे.वाण प्रकल्पातून अकोट शहरासाठी ५.४०, तेल्हारा शहरासाठी १.८०, शेगावसाठी ५.२७, ८४ खेडी पाणीपुरवठा योजनेसाठी १०.७५, जळगाव जामोदसाठी १.२०४ आणि १४० खेडी योजनेसाठी ६.४१६ दलघमी पाणी आरक्षण आहे.मोर्णा प्रकल्पातून पातूर शहरासाठी ०.७० दलघमी, देऊळगाव पास्टुल १६ गावे योजनेसाठी १.९१ दलघमी पाणी आरक्षित आहे. आलेगाव-नवेगाव १४ गावे योजनेसाठी निर्गुणा प्रकल्पातून १.९७ दलघमी, लंघापूर ५९ खेडी योजनेसाठी उमा प्रकल्पातून ०.७० दलघमी पाणी आरक्षित आहे. पारस औष्णिक केंद्रासाठी मन प्रकल्पातून १६.५० दलघमी पाणी आरक्षित आहे. श्री संत गजानन महाराज संस्थान, शेगावसाठी मन प्रकल्पातून १ दलघमी, कसुरा बं. येथून ०.७५ दलघमी पाणी आरक्षित करण्यात आले.पाणी निश्चिती समितीची बैठकही नुकतीच जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेत झाली. त्यात पाणी आरक्षणाबरोबरच इतर विविध बाबींची चर्चा झाली. यंत्रणांनी पाणी आरक्षणाच्या ५० टक्के रक्कम जलसंपदा विभागात जमा करावी. पाणीपट्टी थकबाकी अदा करावी. मंजूर आरक्षणापेक्षा वाढीव मागणी करणा-या प्रकल्पांनी तसे प्रस्ताव जलसंपदा विभागामार्फत सक्षम प्राधिकरणाकडून मंजूर करून घ्यावेत. ई-मीटर लावण्याची कार्यवाही पूर्ण करावी. रब्बी हंगामासाठी सिंचनाचे परिपूर्ण नियोजन करावे, आदी निर्देश देण्यात आले.

### शहराचे तापमान १२.५ अंशांवर...!

**अकोला :** गेल्या दोन दिवसांत अकोला शहरातील तापमानात लक्षणीय घट झाल्याने सकाळ- संध्याकाळ चांगलाच गारवा जाणवू लागला आहे. दि. १० नोव्हेंबर रोजी शहरात किमान तापमान १३.२ अंश सेल्सिअस तर कमाल ३०.६ अंश सेल्सिअस नोंदवले गेले होते. तर दि. ११ नोव्हेंबर रोजी किमान तापमान आणखी खाली येत १२.५ अंशांवर गेले, तर कमाल तापमान ३०.७ अंश इतके राहिले.

## प्रा. कु. सुनिता खेकाळे (भिसे) यांना आचार्य पदवी प्राप्त

**अकोला :** स्थानिक श्री शिवाजी महाविद्यालय,अकोला च्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापीका कु. सुनिता खेकाळे (भिसे) यांना मानव्यविद्या शाखेअंतर्गत हिंदी विषयात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने आचार्य पदवी देवून सन्मानित केले आहे.अमरावती येथील प्रसिद्ध श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या डॉ. ज्योती मंत्री यांच्या मार्गदर्शनात ङ्कडॉ.



गिरिराजशरण अग्रवाल के बालसाहित्य का अनुशीलन या विषयावर त्यांनी संशोधन करून प्रबंध सादर केला होता. प्रा. सुनिता खेकाळे यांनी तिन्ही भाषेच्या विषयात इंग्रजी, मराठी, हिंदी मध्ये एम. ए. पदवी संपादन केली आहे. राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे संशोधनपर शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत.शाळेपासून ते पिजीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिकवण्याचा त्यांचा अनुभव आहे. गेल्या १८ वर्षापासून त्या अध्यापनाचे कार्य करीत आहेत. श्री शिवाजी महाविद्यालयाचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देखील त्यांना मिळाला आहे.त्यांच्या यशाचे श्रेय त्यांनी आई-वडील, पती, मुलगी तनया भिसे तसेचं परिवारास दिले आहे.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एम भिसे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयातील व शहरातील सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### सालासर बालाजी मंदिरात श्याम भजन संध्या

**■अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :** धार्मिक आणि अध्यात्मिक सेवेत सक्रिय असलेल्या ओल्डसिटी परिवारातर्फे प्रथमच सालासर बालाजी, राणी सती दादी, माता शाकंभरी आणि जीण माता यांच्या कृपेने श्यामबाबा जन्मोत्सव भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे.श्यामबाबा जन्मोत्सव पर्वानिमित्त पवित्र ग्यारस शनिवार दि १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता स्थानिक गंगानगर येथील सालासर बालाजी मंदिरात या भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे. या संध्येला इंदूरचे प्रसिद्ध भजन गायक शुभम राणा, नागपूरच्या भजन गायिका कृष्णप्रिया आणि गायक राम देशपांडे सहभागी होतील व संगीतमय श्याम भजने सादर करतील.या उत्सवात खाटू नरेश श्यामबाबांचा दिव्य दरबार, स्वयंभू बोरगाव नरेश



ज्योत दर्शन, राणी सती दादी दरबार, सालासर बालाजी दरबार आणि श्याम दरबार यांच्या भव्य झांकीचे दर्शन घडवले जाईल. तसेच उत्सवात तोरणद्वाराची निर्मिती करण्यात येईल आणि भक्तांसाठी दर्शन व पूजनाची विशेष व्यवस्था असेल.

## पातुर येथे कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिराचे डॉ.विजय जाधव यांच्या हस्ते उद्घाटन

**■पातुर, बु,दि १२ (प्रतिनिधी) :** प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने स्व. नलिनीताई राऊत एम.बी.बी.एस. कॉलेज येथे कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन डॉ. विजय जाधव यांच्या हस्ते पार पडले. यावेळी या शिबिरात तालुक्यात ७ कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया यशस्वी. पार पडल्या. पातुर तालुका प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने पातुर तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेसाठी दि. ११/ ११/ २०२५ रोजी बुधवारी सकाळ पासून भरती प्रक्रिया कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करिता इअचड लेश्रश्रशसश येथे यावर्षीचे पहिले कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले. असून सर्जन डॉ. विजय जाधव यांच्या हस्ते उद्घाटन करीत भरती प्रक्रिया राबवण्यात आली. मा. जिल्हा



आरोग्य अधिकारी डॉ बळीराम गाढवे यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली डॉ. गजानन इंगळे तालुका आरोग्य अधिकारी, प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ गणेश लोखंडे, व डॉ. रोहिणी देवकर मॅडम, तालुका सुपरवायझर जि. व्हि. अवचार, आरोग्य सुपरवायझर मनोहर घुगे, स्वास्थ अभ्यंगता संगीता जाधव,औषधी निर्माण अधिकारी मेघश्याम राऊत,मुख्यालय आरोग्य सेविका विजया वानखेडे, आरोग्य सेविका जयश्री बोळे, आरोग्य सेविका, आरोग्य सेविका संगीता पोहरे, अनिता चोरमारे, शुभांगी नगराळे,सोनल शिरसाठ यांनी शस्त्रक्रियेचे पूर्ण नियोजन केले होते. कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करिता पात्र लाभार्थी असून कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया कॅम्प नियोजनबद्ध आखणी करून आज दिनांक १२/ ११ /२०२५ रोजी इअचड लेश्रश्रशसश येथे यशस्वीरित्या पार पडला कुठल्याही प्रकारचे गुंतागुंत व कुठल्याही प्रकारची कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया लाभार्थींची गैरसोय होणार नाही याची दक्षता आरोग्य विभागामार्फत पुरेपूर घेण्यात आली व कॅम्प यशस्वीरित्या पार पडला.

## रसिकत्वाने परतत्वाप्रत पोहोचविणारा ग्रंथ ज्ञानेश्वरी

### भागवताचार्य हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ

**■अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :** वर्तमानकाळात केवळ यमकाला यमक जोडून जागृत अवस्थेतच स्वप्न साम्राज्याचे एकछत्र सम्राट होऊन , भाषाप्रभू होऊ पाहणाऱ्या कवींचे कवित्व म्हणजे केवळ शब्दांच्या पंखावर बसून कल्पनेच्या आकाशात केलेले स्वैर उड्डाणच असते. परंतु कवित्व हे वाचेची शोभा असून, त्या कवित्वात सुद्धा सुरसतेची बहार असावी लागते. तसेच नुसती सूरसता असून सुद्धा चालत नाही . त्यामध्ये परमात्मा वर्णनाचा संबंध असला पाहिजे अर्थातच कवी नुसता भाषा प्रभू नाही तर , तो प्रभुभाषी भाषाप्रभू असला पाहिजे . तरच ते कवित्व आत्मोद्धाराबरोबरच जगदोद्धारास कारणीभूत होईल. भगवान श्री ज्ञानोबारायांचे कवित्व हे उपरोक्त सर्वच लक्षणांनी युक्त असल्यामुळेच त्यांच्या मुखातून सहज म्हणून बाहेर पडलेले कवित्व हे कवितासंग्रहाच्या रूपाने नव्हे तर , कवित्वाच्या रसिकत्वांनी परतत्वाप्रत पोहोचविणाऱ्या अलौकिक ज्ञानेश्वरी नामक ग्रंथाच्या रूपाने ग्रंथीत झालेले आहे. श्रीगुरु निवृत्तीनाथांच्या आज्ञेवरून भगवान श्री ज्ञानोबारायांनी अमृतानुभव नामक ग्रंथाची निर्मिती केली. तो टीकात्मक ग्रंथ नसून , माऊलीच्या स्वतंत्र प्रज्ञेचे दर्शन विद्वद्अहंमन्य समाजाला घडविण्याकरता पुरेसा



आहे. त्यातील आरंभाचे पाच श्लोक पाहता ते संस्कृत भाषेचे प्रकांड पंडित असल्याने संपूर्ण ग्रंथ काव्यात्मक संस्कृत भाषेत ते सहज लिहू शकले असते याची जाणीव होते. असे असतांना सुद्धा त्यांनी श्रीगुरु निवृत्तीनाथांच्या कृपेने संस्कृत भाषेच्या दरडी फोडून त्यावर मराठी भाषेचा घाट बांधून आबालवृद्धांना तत्त्वज्ञानाच्या गंगेत अवगाहन ( स्नान ) करण्याचा मार्ग मोकळा करून दिला. त्यांच्या कवित्वाला पापाचा विटाळ असल्यामुळे त्यामध्ये कुठेही वर्मस्पर्शी , इंद्रियस्पर्शीता नसून , ते समग्र काव्य हृदयस्पर्शी व परतत्वस्पर्शी आहे. त्यामुळेच ते हृदय नाम अंत:करण शुद्धीचे सर्वोत्तम साधन असल्याने, त्याचे शुद्धीकरण करून आपल्या हृदयास परमात्म्याच्या वास्तव्यास योग्य बनवून , त्यास क्षेत्र संन्यास घेण्यास भाग पाडते. अर्थातच ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या पठण व श्रवणानी शुद्ध झालेल्या अंत:करणात भगवान परमात्मा सदैव क्षेत्र संन्यास घेऊन राहतो.

## घनकचरा ढिगाऱ्याची विल्हेवाट ग्रामपंचायत लावणार काय?

**■अडगांव बु,दि १२ (प्रतिनिधी) :** तेल्हारा तालुक्यातील अडगांव बु ग्रामपंचायत हद्दीतील असलेल्या मुस्लिम कब्रस्तानात, हिंदू स्मशानभूमी व शेती कडे जाणाऱ्या रोडवर ग्रामपंचायतने सर्व गावातील घन कचऱ्याचे ढीग लावून टाकले आहे. त्यातील प्लॉटीक हवेने उडून शेतात जात आहेत.स्मशानभुमी, कब्रस्तानात व शेती कडे जाणाऱ्या ग्रामस्थाना दुर्गंधी मुळे खुप त्रास सहन करावा लागत आहे.त्यातही एखाद्या खोडसर व्यक्तीने ढीगाऱ्यस आग लावली की त्या ढीगाऱ्यातून पाच ते सहा दिवस धुपट सुरू होऊन आरोग्यास याचा धोका निर्माण झाला आहे.शेतकरी व शेतमजूर या रस्त्यावर जाण्यास ही हिचकिच करीत आहेत.पुला जवळ सर्व शेन उकिरडा चे ढीग



साचले आहे.स्मशाभुमी रोडवर केरकचरा व घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. तरीही सरपंच,सचिव किंवा ग्रा.प.सदश्य या कडे लक्ष द्यायला तयार नाही. बाजारात जाणाऱ्या रोडवर, कोंडवाडा व गांवात अतिक्रमणाने जनू काही थैमान घातले आहे. सार्वजनिक संडासांची दुरावस्था झाली आहे. शासनाच्या निधीतून बांधण्यात आलेल्या अंगणवाडी इमारत ओस पडली आहे.या कडे लक्ष द्यायला कोणाकडे वेळच नाही.मात्र शासनाच्या योजने कडे जातीने लक्ष दिल्या जात आहे.जर ग्रामपंचायत अडगांव बु यांनी स्मशानभूमी व शेती रोडवरील घनकचरा ढीगांची विल्हेवाट न लावल्यास ग्रामपंचायत येथे जोरदार शेतकरी व शेतमजूर हे आंदोलन केल्याशिवाय राहणार नाहीत.या आंदोलनाची सर्व जबाबदारी अडगाव बु ग्रामपंचायत ची राहील असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.तदपुर्वी ग्रामपंचायतने या घनकचरा ढीगांची विल्हेवाट लावली व जनतेला होणाऱ्या आजारातून मुक्तता द्यावी नाही तर आंदोलन अटळ राहील याची दक्षता घ्यावी.

## धामणदरी जंगलात ५० वर्षीय महिलेचा मृतदेह आढळला!

**बार्शिटाकळी :** तालुक्यातील धामणदरीच्या जंगलात, धामोरी गावातील रंजना वामन राठोड (५०) ही महिला घरून बकऱ्या चारण्याकरिता ९ नोव्हेंबरला सकाळी गेली होती. मात्र रात्री उशिरापर्यंत ती घरी परतली नसल्याने तिचा जंगलात शोध घेण्याचा प्रयत्न केला असता मिळाली नाही. यासंदर्भात ९ नोव्हेंबरला रात्री ११.४९ वाजत महिला हरविल्याची तक्रार महिलेचा भाऊ माजी सरपंच रेडवा प्रकाश बंडू जाधव यांनी दिली होती.

दुसऱ्या दिवशी म्हणजे १० नोव्हेंबरला सकाळी ८ वाजताच्या सुमारास सदर महिलेचा मृतदेह धामणदरी येथील जंगलात आढळला आहे. या संदर्भात महिलेचा भाऊ प्रकाश जाधव त्यांनी बार्शिटाकळी पोलिसात सकाळच्या सुमारास माहिती दिली. त्यानुसार बार्शिटाकळी पोलीस स्टेशनची पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली आहे. सदर महिलेचा घातपात की खून या संदर्भात सर्वत्र उलटसुलट चर्चा होत आहेत.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ेमला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )**

# अदाणी सिमेंट आणि कूलब्रूक यांनी सिमेंट क्षेत्रातील कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी भागीदारी केली

**अहमदाबाद,/हेलसिंकी, १२ नोव्हेंबर :** अदाणी सिमेंट आणि कूलब्रूक यांनी आंध्र प्रदेशातील बोयारेड्डीपल्ली इंटिग्रेटेड सिमेंट प्लांटमध्ये क्रांतिकारी रोटोडायनॅमिक हीटर (आरडीएच) तंत्रज्ञानाच्या जगातील पहिल्या व्यावसायिक वापरासाठी करार केला आहे, ज्यामुळे सिमेंट उद्योगातील कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले गेले आहे. हे कूलब्रूकच्या आरडीएच तंत्रज्ञानाचे पहिल्यांदाच औद्योगिक स्तरावरील उपयोजन आहे. यामुळे अदाणी सिमेंटला २०५० पर्यंत शून्य-उत्सर्जन लक्ष्य (एसबीटीआय द्वारे सत्यापित) गाठण्यास मदत होईल आणि कूलब्रूकच्या जागतिक स्तरावर जड उद्योगांमधून दरवर्षी २.४ अब्ज टन $CO_2$ उत्सर्जन कमी करण्याच्या उद्दिष्टाला चालना मिळेल.

हे तंत्रज्ञान सिमेंट उत्पादनातील सर्वाधिक जीवाश्म इंधन वापराच्या कॅल्सिनेशन फेजला कार्बनमुक्त करेल. पर्यायी इंधन सुकवण्यासाठी आणि त्यांची ऊर्जामूल्य वाढवण्यासाठी स्वच्छ ऊष्मा उपलब्ध करून देऊन, हे तंत्रज्ञान जीवाश्म इंधनांच्या ऐवजी टिकाऊ पर्यायांचा अधिकाधिक वापर शक्य करेल. या वापरामुळे दरवर्षी सुमारे ६०,००० टन कार्बन उत्सर्जनात घट अपेक्षित असून भविष्यात ही क्षमता १० पट वाढण्याची शक्यता आहे, ज्यामुळे सिमेंट उत्पादनाच्या डीकार्बोनायझेशनमध्ये हे एक मोठे पाऊल ठरेल.

विनोद बाहेती, सीईओ – सिमेंट व्यवसाय प्रमुख, अदाणी समूह म्हणाले: कूलब्रूकच्या रोटोडायनॅमिक हीटर च्या जगातील पहिल्या व्यावसायिक उपयोजनाने आमच्या डीकार्बोनायझेशन प्रवासात एक ऐतिहासिक क्षण गाठला आहे. हे आमच्या नेट-झिरो लक्ष्याकडे जाणारे मोठे पाऊल आहे. आम्ही आमच्या सिमेंट उत्पादनात अशा अत्याधुनिक विद्युतकरण उपायांचा समावेश करून जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी करत आहोत, मोठ्या प्रमाणात उत्सर्जन घटवत आहोत, स्वच्छ ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवत आहोत आणि कमी-कार्बन सिमेंट उत्पादनाचे नवे मापदंड निर्माण करत आहोत. ही भागीदारी आमची नवोपक्रम आणि शाश्वततेसाठी असलेली कटिबद्धता दर्शवते. हा टप्पा आमच्या पायोनियरिंग वारशाचे प्रतीक असून आम्हाला जागतिक स्तरावरील बिल्डिंग मटेरियल्स सोल्यूशन्स पॉवरहाऊस बनविण्याच्या आमच्या दृष्टीला बळकटी देतो. आम्ही कूलब्रूकसारख्या भागीदारांसोबत आणि आमच्या आरअँडडी गुंतवणुकीद्वारे मजबूत इकोसिस्टम उभारतो आहोत.

कूलब्रूकचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जोनास राउरामो म्हणाले, अदाणी सिमेंटसोबत जगातील पहिल्या औद्योगिक प्रकल्पामध्ये सहभागी होणे हे औद्योगिक विद्युतकरणाच्या दृष्टीने एक परिवर्तनकारी पाऊल आहे. आमचे उद्दिष्ट म्हणजे रोटोडायनॅमिक तंत्रज्ञानाला अवघड-उत्सर्जन कमी करण्यायोग्य क्षेत्रांसाठी नवा उद्योगमानक बनवणे. आम्ही मिळून सिमेंट उत्पादनाची पद्धत बदलत आहोत अधिक स्वच्छ, अधिक कार्यक्षम आणि नेट-झिरो भविष्याकरिता तयार.

अदाणी सिमेंटचे व्यापक शाश्वत नेतृत्व हे देखील प्रतिबिंबित होते कारण ते जगातील केवळ चार मोठ्या सिमेंट कंपन्यांपैकी एक आहे ज्यांनी एसबीटीआय-मान्यताप्राप्त नेट-झिरो लक्ष्य साध्य केले आहे, तसेच इरेना अंतर्गत स्थापन झालेल्या अलायन्स फॉर इंडस्ट्री डीकार्बोनायझेशनमध्ये सामील होणारा जगातील पहिला सिमेंट उत्पादक आहे.

# जागतिक मधुमेह दिन २०२५ : या हिवाळ्यात वाढत्या मधुमेहाचे धोके समजून घेऊया

**डॉ. स्वरूप वर्मा, इंटरनल मेडिसिन आणि जनरल फिजिशियन, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर**

**नागपूर, १२ नोव्हेंबर :** हिवाळा सुरु होताच विदर्भ आणि नागपूर परिसरात मधुमेह नियंत्रणाकडे अधिक जागरूकतेची गरज भासते. हिवाळ्यात थंड हवामानामुळे दैनंदिन जीवनशैलीत अनेक बदल दिसून येतात. शारीरिक हालचाल कमी होते, जड अन्न खाल्ले जाते आणि झोपेचा क्रम बिघडतो. ज्यामुळे रक्तातील साखरेचे नियंत्रण अधिक कठीण होते. अनेक लोकांमध्ये मधुमेह हा नेहमीप्रमाणे लठ्ठपणा किंवा हालचालीच्या अभावामुळेच होत नाही.



डॉ. स्वरूप वर्मा, इंटरनल मेडिसिन आणि जनरल फिजिशियन, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर यांनी सांगितले कि, अलीकडच्या स्थानिक निष्कर्षांनुसार एक चिंताजनक गोष्ट समोर आली आहे.

विदर्भात अधिकाधिक लोकांना कमी वयातच टाइप २ मधुमेह होत आहे, आणि त्यापैकी बरेच जण दिसायला सडपातळ, बारीक आणि पूर्णपणे निरोगी आहेत. मधुमेहाचा हा अपारंपरिक प्रकार दाखवतो की फक्त लठ्ठपणा किंवा निष्क्रिय जीवनशैलीमुळेच मधुमेह होतो, असे नाही. ग्रामीण भारतातील जवळपास ४५ टक्के लोक आता मधुमेहाने प्रभावित असल्याचा अंदाज वर्तविला जातो, म्हणजे हा आजार शहरांच्या पलीकडे ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात पसरला आहे. फक्त नागपूरमध्येच सुमारे ३०,००० लोकांना मधुमेह असल्याची शक्यता आहे, पण त्यांना याची कल्पनाच नाही असे मी निरीक्षण केले आहे. विशेषतः अर्ध-शहरी (उपनगर) आणि ग्रामीण भागांमध्ये, जिथे जनजागृती आणि तपासणीची सुविधा अजूनही मर्यादित आहे.

डॉ. स्वरूप वर्मा, पुढे म्हणाले, जास्त ताण, कुटुंबातील मधुमेहाचा इतिहास, उच्च रक्तदाब आणि दीर्घकाळ बसून राहण्याची सवय यांसारख्या जीवनशैलीशी संबंधित सवयींमुळे मधुमेहाचा धोका आणखी वाढतो. हिवाळ्यात ही जोखीम अधिक वाढते. थंडीत बाहेरची हालचाल कमी होते, पचायला जड अन्न खाल्ले जाते आणि सणासुदीच्या काळातील खाणेपिणे वाढते, त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात ठेवणे अधिक कठीण होते. म्हणूनच स्थानिक आरोग्य तज्ञ हिवाळ्यात विशेष तपासणी आणि लवकर निदान मोहिम राबवण्याचे आवाहन करत आहेत. या मोहिमा फक्त लठ्ठ किंवा वृद्ध लोकांपुरते मर्यादित नसून तरुण आणि सडपातळ बारीक दिसणाऱ्या व्यक्तींनाही लक्षात घेऊन राबवले जात आहेत, कारण त्यांनाही मधुमेहाचा धोका असू शकतो.

या जागतिक मधुमेह दिनानिमित्त, विदर्भासाठीचा संदेश तातडीचा पण आशादायक आहे. हिवाळ्यात जीवनशैलीत बदल होत असल्यामुळे साखरेचे प्रमाण वाढल्याची लक्षणे ओळखणे कठीण होते, त्यामुळे वेळेवर तपासणी आणि लवकर निदान करणे खूप महत्त्वाचे आहे.

लक्ष देण्यासारखी सुरुवातीची लक्षणे:

मधुमेहाची काही सुरुवातीची लक्षणे म्हणजे खूप तहान लागणे, वारंवार लघवी होणे, कारण नसताना थकवा जाणवणे, वजनात अचानक बदल होणे, दृष्टी धूसर होणे, जखमा हळू हळू भरून येणे आणि वारंवार संसर्ग होणे. जवळपास ६०% लोकांमध्ये कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. त्यामुळे सर्वांनी या हिवाळ्यात आरोग्य तपासणी करून घ्यावी, नियमित व्यायाम करावा, सक्रिय राहावे, आहारावर नियंत्रण ठेवावे आणि आपले आरोग्य स्वतः सांभाळावे. कारण मधुमेहाचे बदलते स्वरूप समजून घेणे हे त्यावर नियंत्रण मिळवण्याचे पहिले पाऊल आहे.

# आईक्यू ने २० नोव्हेंबरपासून आईक्यू १५ साठी प्री-बुकिंगची घोषणा केली आहे



**नवी दिल्ली, १२ नोव्हेंबर :** उच्च-कार्यक्षमता असलेला स्मार्टफोन ब्रँड, आईक्यू २६ नोव्हेंबर रोजी आईक्यू१५ लाँच करण्यासाठी सज्ज आहे. स्मार्टफोन इनोव्हेशनमध्ये नवीन मानके स्थापित करत, आईक्यू १५ प्रीमियम कामगिरीसह प्रगत कॅमेरा, सॉफ्टवेअर क्षमता आणि एआय क्षमता, एक आकर्षक डिझाइन, विस्तारित बॅटरी लाइफ आणि इमर्सिव्ह डिस्प्ले तंत्रज्ञानाचा मेळ घालते जे एक अतुलनीय स्मार्टफोन अनुभव प्रदान करते.

आईक्यू १५ ची प्री-बुकिंग २० नोव्हेंबर २०२५ पासून सुरू होईल. ग्राहक त्यांचा फोन प्री-बुक करण्यासाठी १००० रुपये परत करण्यायोग्य रक्कम देऊन प्रायोरिटी पास मिळवू शकतात. प्रायोरिटी पाससह, तुम्हाला विशेष प्री-बुकिंग फायदे देखील मिळतील, ज्यामध्ये आईक्यू टीडब्ल्यूएस १ई इयरबड्सची एक मोफत जोडी आणि १२ महिन्यांची वाढीव वॉरंटी समाविष्ट आहे. प्रायोरिटी पास मर्यादित आहेत आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर दिले जातील.

आईक्यू १५ मध्ये स्नॅपड्रॅगन ८ एलिट जेन ५ आहे आणि तो अँड्रॉइड १६ वर आधारित ओरिजिनओएस ६ चालवतो, ज्याने ४ दशलक्षाहून अधिक प्रभावी AnTuTu स्कोअर मिळवला आहे. आईक्यू १५ वापरकर्त्यांना ५ वर्षांच्या ओएस अपडेट्स आणि ७ वर्षांच्या सुरक्षा समर्थनासह दीर्घकालीन विश्वासार्हता देईल, ज्यामुळे ते ब्रँडचे आतापर्यंतचे सर्वात भविष्यासाठी तयार फ्लॅगशिप बनेल. ही विस्तारित अपडेट वचनबद्धता वापरकर्त्यांना येणाऱ्या वर्षांसाठी नवीनतम वैशिष्ट्ये, कार्यप्रदर्शन ऑप्टिमायझेशन आणि सुरक्षा सुधारणांचा आनंद घेण्यास अनुमती देते, सतत सॉफ्टवेअर दीर्घायुष्यासाठी सेगमेंटमध्ये एक नवीन बेंचमार्क सेट करते.

आईक्यू क्यू३ सुपरकॉम्प्युटिंग चिपद्वारे समर्थित आहे, जी १४४ एफपीएस पर्यंत फ्रेम इंटरपोलेशनसह सुरळीत कामगिरी देते, लेटन्सी कमी करते आणि त्याच्या पूर्ववर्तीपेक्षा व्हिज्युअल सुधारते. यात भारतातील सर्वात मोठी ८के वीसी कूलिंग सिस्टम आणि रे ट्रेसिंग तंत्रज्ञान देखील आहे, जे वास्तववादी परावर्तन, अपवर्तन आणि विखुरणे यासारख्या वास्तविक-जगातील प्रकाश वर्तनाची प्रतिकृती बनवते, प्रकाश आणि सावल्यांना जिवंत बनवते आणि अधिक वास्तववादी गेमिंग अनुभव देते.

हा फ्लॅगशिप फोन दोन रंग पर्यायांमध्ये लाँच केला जाईल: मॅट ब्लॅक फिनिशसह अल्फा एडिशन आणि टाइमलेस व्हाइटमध्ये लेजेंड एडिशन, ज्यामध्ये नवीन ट्राय-कलर पॅटर्न लोगो आहे.

'मेक इन इंडिया' साठीआईक्यू ची वचनबद्धता पुढे चालू ठेवत, आईक्यू १५ व्हिवोच्या ग्रेटर नोएडा प्लांटमध्ये तयार केले जाईल. तसेच, त्यांच्या मौल्यवान ग्राहकांना त्रासमुक्त विक्री-पश्चात सेवा अनुभव सुनिश्चित करण्यासाठी, आईक्यू ग्राहक आता देशभरातील कंपनीच्या ६७० सेवा केंद्रांपैकी कोणत्याही केंद्राला भेट देऊ शकतात.

# मायबिझ बाय मेकमायट्रिप आणि स्विगी यांची भागीदारी: कॉर्पोरेट प्रवाशांसाठी सोयीसुविधा उपलब्ध

**गुरुग्राम, १२ नोव्हेंबर :** मेकमायट्रिपच्या एसएएएस-आधारित कॉर्पोरेट बुकिंग प्लॅटफॉर्म मायबिझ आणि भारतातील अग्रगण्य ऑन-डिमांड कन्व्हिनियन्स प्लॅटफॉर्म स्विगी (स्विगी लिमिटेड, एनएसई: स्विगी / बीएसई: ५४४२८५) यांनी आज देशभरातील लाखो कॉर्पोरेट प्रवाशांसाठी जेवणाच्या खर्चाचे व्यवस्थापन सुलभ करण्यासाठी भागीदारीची घोषणा केली. तंत्रज्ञानावर आधारित दृष्टिकोनामुळे, मायबिझ भारतातील अग्रगण्य कॉर्पोरेट ट्रॅव्हल प्लॅटफॉर्मपैकी एक म्हणून उदयास आले आहे, जे देशभरातील ७५,००० हून अधिक कॉर्पोरेट्स आणि लघु व मध्यम उद्योगांना सेवा पुरवते. फ्लाइट्स, हॉटेल्स, ग्राउंड ट्रान्सपोर्ट, व्हिसा आणि ट्रॅव्हल इन्शुरन्ससारख्या गुंतागुंतीच्या श्रेणींना कॉर्पोरेट क्षेत्रासाठी आधीच सुलभ केल्यानंतर, मायबिझ आता स्विगीसोबत हातमिळवणी करून व्यावसायिक प्रवासातील पुढील सर्वात आव्हानात्मक घटकावर लक्ष केंद्रित करत आहे जेवणाचा खर्च, जो भारताच्या कॉर्पोरेट प्रवास खर्चाच्या ११% पेक्षा जास्त आहे.

मेकमायट्रिपचे सहसंस्थापक आणि ग्रुप सीईओ राजेश मागो म्हणाले, मायबिझने नेहमीच त्या ऑपरेशनल गॅप्स सोडवून उद्योगाला मागे टाकले आहे, जे उद्योगांसाठी सर्वात महत्त्वाचे आहेत. या भागीदारीद्वारे आम्ही स्विगीच्या अद्वितीय रेस्टॉरंट नेटवर्क आणि डिलिव्हरी इन्फ्रास्ट्रक्चरला मायबिझच्या कॉर्पोरेट ट्रॅव्हल इकोसिस्टमशी जोडत आहोत, ज्यामुळे व्यवसायातील जेवण व्यवस्थापनातील गुंतागुंत संपेल. कॉर्पोरेट प्रवास केवळ अखंड न राहता, कर्मचाऱ्यांसाठी आणि वित्तीय टीमसाठी खऱ्या अर्थाने सुरुवातीपासून शेवटपर्यंत सोयीस्कर बनवण्याच्या आमच्या ध्येयाच्या दिशेने हे एक पुढचे पाऊल आहे.

स्विगी फूड मार्केटप्लेसचे सीईओ रोहित कपूर म्हणाले, कोणत्याही व्यक्तीने जर कामासाठी प्रवास केला असेल, तर त्यांना माहिती आहे की सर्वात कठीण भाग मीटिंग नसतो, तर जेवणाची व्यवस्था आणि त्यानंतरचे रिंबर्समेंट फाइल करणे असते. मायबिझसोबतची ही भागीदारी तो त्रास दूर करते. व्यवसायिक प्रवासी आता त्यांच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकतात, तर स्विगी त्यांचे जेवण निश्चित करते. कॉर्पोरेट प्रवासी स्विगीच्या विस्तृत रेस्टॉरंट नेटवर्कमधून ऑर्डर करू शकतात आणि जेथे आहेत तेथे जेवण मिळवू शकतात किंवा शहरातील त्यांच्या आवडत्या रेस्टॉरंटमध्ये जेवणाचा आनंद घेऊ शकतात, ज्याचे पेमेंट त्यांच्या मायबिझ वॉलेटद्वारे तत्काळ केले जाईल. एकदा ऑथेंटिकेशन झाल्यावर, हा प्रवाह कोणत्याही स्विगी व्यवहारासारखाच असतो फक्त चेकआउटपूर्वी कॉर्पोरेट मोडवर एक साधा टॉगल करावा लागतो. हे एक साधे पण प्रभावी कल्पकतेचे उदाहरण आहे, जे वेळ वाचवू शकते, त्रास कमी करू शकते आणि व्यावसायिक प्रवास अधिक सुलभ बनवू शकते. योग्य प्लॅटफॉर्म्स जोडले गेले की तंत्रज्ञान किती परिवर्तनकारी ठरते याचे हे उत्तम उदाहरण आहे.

स्विगी फॉर वर्कवरील बिल टू कंपनी फीचरच्या प्रवेशाव्यतिरिक्त, वापरकर्त्यांना स्विगीच्या कॉर्पोरेट रिवॉर्ड्स प्रोग्रामद्वारे फूड, डायनआउट आणि इंस्टामार्टसह सर्व बिझनेस युनिट्समध्ये खास रिवॉर्ड्स आणि ऑफर्स मिळतील. मे महिन्यात भारतातील ३०+ शहरांतील ७,००० टेक पार्क्समध्ये लाँच झाल्यानंतर, या प्रोग्रामला प्रचंड सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, केवळ ६ महिन्यांत तो २७,०००+ कॉर्पोरेट्स आणि २.५ लाख ऑथेंटिकेटेड युजर्सपर्यंत विस्तारला आहे.

# रे-बॅन मेटा जेन १ ग्लासेस लवकरच ॲमेझॉन, फ्लिपकार्ट व रिलायन्स डिजिटलवर उपलब्ध असतील

**नागपूर, १२ नोव्हेंबर :** रे-बॅन मेटा जेन १ ग्लासेस २१ नोव्हेंबर रोजी ॲमेझॉन, फ्लिपकार्ट आणि Reliancedigital.in वर लाँच होण्यास सज्ज आहेत, ज्यासह भारतभरातील अधिकाधिक ग्राहकांना मेटाचे नाविन्यपूर्ण वीअरेबल तंत्रज्ञान उपलब्ध होईल.



नोव्हेंबरपासून व्यक्ती या रिटेलर्सकडून ऑनलाइन रे-बॅन मेटा जेन १ श्रेणी खरेदी करणाऱ्यांपैकी एक होण्यासाठी 'नोटिफाय मी' अलर्ट्सकरिता साइन अप करू शकतात, जेथे दैनंदिन अभिव्यक्ती व कनेक्शनसाठी प्रतिष्ठित रे-बॅन स्टाइल आणि मेटाचे प्रगत हँड्स-फ्री तंत्रज्ञान एकत्र करण्यात आले आहे.

मेटाच्या भारत व आग्नेय आशियामधील उपाध्यक्ष संध्या देवनाथन म्हणाल्या, ''मेटामध्ये आमचा विश्वास आहे की, कम्प्युटिंगचे भविष्य अत्यंत वैयक्तिक, विनासायासपणे एकीकृत आणि दृढपणे सक्षम करणारे असेल. आम्ही दैनंदिन जीवनामध्ये प्रभावीपणे सामावून जाणाऱ्या डिवाईसेसच्या माध्यमातून प्रत्येकासाठी वैयक्तिक सुपरइंटेलिजन्स आणण्याच्या मिशनवर आहोत. एआय ग्लासेस आकर्षक दिसण्यासोबत शक्तिशाली एआय टूल्स देखील देतात, जे तुम्हाला वर्तमान घडामोडींशी संलग्न राहण्यास, उत्तमपणे संवाद साधण्यास आणि तुमच्या संवेदना वाढवण्यास मदत करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत. रे-बॅन मेटा ग्लासेसमधून वीअरेबल तंत्रज्ञानाच्या नवीन अध्यायाचे नेतृत्व करण्याप्रती आमची कटिबद्धता दिसून येते, जेथे भारत त्या प्रवासाचा प्रमुख भाग आहे आणि स्मार्टफोनपलीकडे कम्प्युटिंग प्लॅटफार्म्समधील पुढील वाटचालीला सादर करते.''

रे-बॅन मेटा जेन १ कलेक्शन विविध फ्रेम आणि लेन्स व्हेरिएण्ट्ससह उपलब्ध असेल. मेटा एआय बिल्ट इन असल्यामुळे तुम्ही प्रश्न विचारण्यासाठी, माहिती मिळवण्यासाठी किंवा हँड्सफ्री तुमचे ग्लासेस (चष्मा) नियंत्रित करण्यासाठी फक्त 'हे मेटा' म्हणू शकता. या कलेक्शनमध्ये क्लासिक रे-बॅन फ्रेम्स आहेत, ज्यामध्ये प्रिस्क्रिप्शन, सन, पोलराइज्ड आणि ट्रान्झिशन्स लेन्सचा समावेश आहे, ज्या खिशामध्ये सहजपणे मावणाऱ्या चार्जिंग केससह येतात. दृश्यमान कॅप्चर एलईडी इंडिकेटर कॅमेरा सक्रिय असताना प्रकाशित होऊन पारदर्शकतेची खात्री देते, जेथे पुढील बाजूस व मध्यभागी गोपनीयता आणि स्टाइलला सादर करते.

नुकतेच, रे-बॅन मेटा ग्लासेससाठी नवीन अनुभवांची घोषणा करण्यात आली, ज्यामुळे ते भारतातील वापरकर्त्यांसाठी अधिक स्मार्ट, अधिक वैयक्तिक आणि अधिक धमाल झाले आहेत. तुम्ही आता मेटा एआयसोबत हिंदीमध्ये संवाद साधू शकता. आम्ही दीपिका पदुकोनचा सेलिब्रिटी एआय वॉइस देखील सादर केला आहे, ज्यासह तुमच्या परस्परसंवादांमध्ये प्रचलित आणि सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्वाची भर करण्यात आली आहे. नुकतेच सणासुदीच्या काळात लाँच करण्यात आलेले नवीन 'रिस्टाइल' वैशिष्ट्य तुम्हाला 'हे मेटा, रिस्टाइल धीस' म्हणत फोटोजना लाइट्स, कलर्स व सेलिब्रेटरी थीम्ससह बदलण्याची सुविधा देते. लवकरच, मेटा यूपीआय लाइट पेमेंट्सची चाचणी सुरू करणार आहे, ज्यामुळे तुम्ही क्यूआर कोडकडे पाहत आणि 'हे मेटा, स्कॅन अँड पे' म्हणत १,००० रूपयांपेक्षा कमी रकमेचे पेमेंट्स त्वरित करू शकता. हे सर्व व्यवहार तुमच्या ग्लासेसच्या माध्यमातून विनासायासपणे व सुरक्षितपणे करता येऊ शकतात.

# अंध महिलांच्या क्रिकेटला इंडसइंड बँकेचे पाठबळ – भारताच्या टी-२० महिला विश्वचषक संघाला पाठिंबा

**मुंबई, १२ नोव्हेंबर :** भारतीय क्रीडा क्षेत्रात एक ऐतिहासिक क्षण आलेला आहे. जगातील पहिल्यावहिल्या महिला अंध टी-२० विश्वचषकात सहभागी होण्यासाठी भारतीय अंध महिला क्रिकेट संघ सज्ज झाला आहे. भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने ११ ते २३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

समर्थनम ट्रस्ट फॉर द डिसेबल्डची क्रिकेट शाखा आणि उपक्रम असलेल्या क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडियाच्या (सीएबीआय) सहकार्याने इंडसइंड बँक त्यांच्या सीएसआर उपक्रमाद्वारे भारतीय संघाला पाठिंबा देते. विविधता, सर्वसमावेशकता आणि खेळाच्या परिवर्तनीय शक्तीसाठी बँकेची अढळ वचनबद्धता हे सहकार्य अधोरेखित करते.

या स्पर्धेत ऑस्ट्रेलिया, भारत, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका आणि अमेरिका या सात देशांचा समावेश असेल. नवी दिल्ली, बेंगळुरू आणि कोलंबो येथे हे सामने होणार आहेत.

बँकेच्या सहकार्याबद्दल इंडसइंड बँकेचे कॉर्पोरेट, कमर्शियल आणि ग्रामीण बँकिंग प्रमुख श्री. संजीव आनंद म्हणाले, अंधांसाठीच्या जगातील पहिल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेची तयारी करत असलेल्या भारतीय अंध महिला क्रिकेट संघाला पाठिंबा देण्याचा आम्हाला अभिमान आहे. इंडसइंड बँकेत आम्ही सर्वसामावेशकतेला सर्वाधिक महत्त्व देतो. ते आमचे एक व्यावसायिक मूल्य आहे. सीएबीआयसोबतची आमची दीर्घकालीन भागीदारी ही समान संधी निर्माण करण्याची आणि अडथळ्यांच्या पलीकडे जाऊन कौशल्याचा उत्सव साजरा करण्याची आमची वचनबद्धता दर्शवते. हे खेळाडू त्यांचे कौशल्य आणि दृढनिश्चयाने आम्हाला प्रेरणा देतात. तसेच जागतिक स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करताना त्यांच्यासोबत उभे राहण्याचा आम्हाला सन्मान वाटतो.

या भागीदारीबद्दल सीएबीआय चे अध्यक्ष डॉ. महांतेश जी. किवदासन्नावर म्हणाले, सीएबीआय आणि संपूर्ण देशासाठी हा खरोखरच अभिमानाचा क्षण आहे. हा टप्पा गाठण्यासाठी आमच्या महिला संघाने अतुलनीय धैर्य, चिकाटी आणि उत्कृष्टतेचे उदाहरण दिले आहे. त्यांच्या कामगिरीतून दिव्यांगांच्या क्रिकेटची वाढती ताकद आणि सर्वसमावेशकता दिसून येते. दृष्टिहीन खेळाडूंना सक्षम बनवण्याच्या आमच्या ध्येयाला भक्कम पाठबळ देण्यासाठी आम्ही इंडसइंड बँकेचे मनापासून आभारी आहोत. या गुणी महिलांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यात आणि खेळाच्या माध्यमातून देशाला सन्मान मिळवून देण्याचा त्यांचा उदात्त हेतू पूर्ण करण्यात बँकेच्या सहकार्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**गुरूवार दि. १३ नोव्हेंबर २०२५**

| कल्याण बाजार (पत्थर फोड एकच) | | | | मुंबई बाजार (पत्थर फोड एकच) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| १०० | ७८९ | १२४ | २६० | ४९९ | १४० | १२३ | १६० |
| ६७८ | ६८० | २७८ | ४५९ | २४६ | २५८ | २५९ | २५० |
| ४७० | ५९० | ४६७ | ३५० | १५६ | ६९० | ४५७ | ३४० |

जोडी (कल्याण): १५ - ४५ - ७२ - ८२ / १६ - ४६ - ७० - ८० / १९ - ४९ - ७३ - ८३
जोडी (मुंबई): २४ - ५४ - ६१ - ७१ / २८ - ५८ - ६० - ७० / २२ - ५५ - ६६ - ७७

जबरदस्त पास होणारे चान्सेस १३ नोव्हेंबर २०२५

**गुरूवार दि. १३ नोव्हेंबर २०२५**

सर्व बाजार साठी
२१ - ३१ - ६१ - ९६
२७ - ३७ - ६० - ९०
२३ - ३२ - ६८ - ९८
१३८ - १४८ - २४० - २७०
३४५ - ३४६ - ३६७ - ४६९
६७९ - २५६ - ४४८ - ११७

सर्व बाजारासाठी
गुरू. ते शनि. ओपन डे: ३४६ ४५६ १२३ / २२१ ३ ६१० ५ २६८ ६ / १२० ७८० ३६७
गुरू. ते शनि. ओपन नाईट: २०० ४४६ ६०० / ३१० २ ५९० ४ १५० ६ / ४८० ६८० २४०
गुरू. ते शनि. क्लोज डे: ५७० ३५५ १४९ / ६७९ २ ५९९ ३ २५७ ४ / ७७८ ४९० ७८९
गुरू. ते शनि. क्लोज नाईट: १२० १७८ २३४ / ३०० ३ ३५८ ६ ४५० ९ / ५८० २७७ ५६८

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
१ ० ९ ८ ७

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**

# अदाणी पोर्ट्स टीएनएफडीचे सदस्य बनले

**अहमदाबाद, १२ नोव्हेंबर :** भारतातील सर्वात मोठी इंटिग्रेटेड ट्रान्सपोर्ट युटिलिटी असलेले अदाणी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड, निसर्गाशी संबंधित वित्तीय प्रकटीकरण कार्यबल (टीएनएफडी) मध्ये अॅडॉप्टर म्हणून सामील झाली आहे. या माध्यमातून कंपनीने निसर्गाशी संबंधित अवलंबन, परिणाम, जोखमी आणि संधींवर आधारित टीएनएफडी-अनुरूप अहवाल प्रणाली राबविण्याचे वचन दिले आहे. यामुळे एपीएसईझेड ही टीएनएफडी फ्रेमवर्क स्वीकारणारी भारतातील पहिली इंटिग्रेटेड ट्रान्सपोर्ट युटिलिटी ठरली असून, निसर्ग-पॉझिटिव्ह पायाभूत विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

टीएनएफडी ही एक जागतिक, विज्ञानाधारित पुढाकार योजना आहे, जी युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्रॅम फायनान्स इनिशिएटिव्ह, युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्रॅम, वर्ल्ड वाइल्डलाइफ फंड आणि ग्लोबल कॅनोपी यांच्या संयुक्त सहकार्याने स्थापन झाली आहे. या उपक्रमाचे उद्दिष्ट कंपन्यांना निसर्गाशी संबंधित जोखमी व संधी ओळखणे, त्यांचे मूल्यमापन करणे, व्यवस्थापन करणे आणि प्रकटीकरण करणे यासाठी मार्गदर्शन करणे आहे.

या जागतिक उपक्रमात सामील होऊन एपीएसईझेड आता जैवविविधतेचे संवर्धन करणाऱ्या आंतरराष्ट्रीय बंदर ऑपरेटरांच्या निवडक गटाचा भाग बनली आहे. कंपनीने विज्ञानाधारित आणि पारदर्शक पर्यावरणीय अहवाल प्रणालीद्वारे सागरी परिसंस्थांचे संरक्षण करण्याची आपली वचनबद्धता अधिक दृढ केली आहे.

एपीएसईझेडने आधीच जागतिक मान्यतेच्या फ्रेमवर्कशी सुसंगत हवामान जोखीम मूल्यांकन आणि प्रकटीकरण प्रणाली राबवली आहे. कंपनीने ४,२०० हेक्टरहून अधिक मॅन्ग्रोव्ह वृक्षारोपण केले असून अतिरिक्त ३,००० हेक्टर मॅन्ग्रोव्ह क्षेत्राचे संरक्षण सक्रियपणे केले जात आहे. त्यामुळे एपीएसईझेड भारतामध्ये मॅन्ग्रोव्ह परिसंस्था पुनर्स्थापनेसाठी योगदान देणारी सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील संस्था ठरली आहे. हे प्रयत्न केवळ जैवविविधता वाढवतातच नाहीत, तर हवामानाशी संबंधित जोखमींच्या विरोधात नैसर्गिक संरक्षण कवच म्हणून कार्य करतात आणि कंपनीच्या दीर्घकालीन व्यवसायिक टिकाऊपणास बळकटी देतात.

अश्विनी गुप्ता, संपूर्णवेळ संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, एपीएसईझेड म्हणाल्या की, आम्हाला ठाम विश्वास आहे की जबाबदार व्यावसायिक पद्धती दीर्घकालीन यशाला चालना देतात. टीएनएफडी फ्रेमवर्कचा स्वीकार करून आम्ही सीओपी३० दरम्यान निसर्गाशी संबंधित कॉर्पोरेट अहवाल देण्यास पाठिंबा दर्शवला आहे. आम्ही निसर्गाशी संबंधित मुद्द्यांना धोरणात्मक जोखीम व्यवस्थापनाच्या प्राधान्य म्हणून पाहतो. टीएनएफडी फ्रेमवर्क आमच्या निर्णयप्रक्रियेत निसर्गाचा समावेश करण्यासाठी आणि जैवविविधता संवर्धनातील आमच्या योगदानास बळकटी देण्यासाठी सक्षम पाठबळ पुरवतो.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुमचे काम पूर्ण करण्यासाठी तुम्हाला थोडा वेळ लागू शकतो, परंतु ते पूर्ण झाल्यावर तुम्हाला आनंद होईल. तुम्ही तुमचा परिसर स्वच्छ ठेवण्याची पूर्ण काळजी घ्याल.

**वृषभ :** विद्यार्थ्यांना त्यांच्या वरिष्ठांकडून काहीतरी नवीन शिकायला मिळेल. आज तुम्हाला काही कामासाठी धावपळ करावी लागू शकते. ऑफिसमध्ये तुमच्या कामाची प्रशंसा होईल.

**मिथुन :** आज तुमच्या व्यवसाय योजना अनोळखी लोकांसोबत शेअर करू नका, कोणीतरी त्याची नक्कल करू शकते. जुन्या मालमत्तेच्या विक्री आणि खरेदीशी संबंधित व्यवसायांना चांगले सौदे मिळतील.

**कर्क :** राजकारणात जाण्याचा विचार करणाजयांनी सावधगिरी बाळगण्याची गरज आहे, त्यांचे विरोधक त्यांची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करू शकतात. तुमच्या संपत्तीत वाढ झाल्याने तुम्ही खूश व्हाल.

**सिंह :** घर किंवा दुकानाशी संबंधित समस्या सोडवल्या जाऊ शकतात. नोकरी करणाजयांसाठी दिवस चांगला जाईल. नेहमीप्रमाणे तुमचे काम सुरू ठेवा. तुम्हाला पदोन्नती मिळू शकते. प्रयत्न सुरू ठेवा.

**कन्या :** आजचा दिवस नोकरी करणाजयांसाठी चांगला राहणार आहे. ऑफिसच्या समस्या ऑफिसमध्येच सोडा, त्या घरी आणू नका, यामुळे तुमच्या घराचे वातावरणही बिघडू शकते.

**तुळ :** कुटुंबातील सदस्यांसह एखाद्या धार्मिक कार्यक्रमात सहभागी होऊ शकता. आज तुमच्या कामात तुमच्या जोडीदाराकडून पूर्ण सहकार्य मिळेल. जोडीदाराची काळजी घ्या.

**वृश्चिक :** तुमच्या मुलांकडे विशेष लक्ष द्या. तुम्ही तुमच्या व्यावसायिक घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवाल. प्रॉपर्टीशी संबधित कामं करताना लक्ष देऊन काम करा. प्रयत्न केल्यानंतरच तुम्ही यशस्वी व्हाल.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंदाचा असेल. तुमचे मित्र तुमच्याकडे मदत मागतील, पण तुम्ही त्यांना निराश करणार नाही. व्यावसायिकांना चांगला नफा मिळेल. आज खरेदीचा योग आहे.

**मकर :** एखाद्या वृद्ध व्यक्तीला मदत केल्यानंतर तुम्हाला बरे वाटेल. विज्ञान शिक्षकांचा आजचा दिवस व्यस्त असेल. ऑफीसच्या कामात वाढ होईल, डोक्याला ताप होऊ शकतो.

**कुंभ :** पालकांच्या आरोग्याची काळजी घ्या. तुमच्या आयुष्यात प्रेम वाढवण्यासाठी अधिक प्रयत्न करा, ज्यामुळे तुमच्या प्रियजनांच्या वागण्यातही बदल होईल. तुमच्या वैवाहिक संबंधातील मतभेद दूर होतील.

**मीन :** विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला असेल. परीक्षेतील सकारात्मक निकाल तुम्हाला आनंद देईल. तुमच्या आणि तुमच्या जोडीदारामधील कोणतेही गैरसमज आज दूर होतील.

## शब्दकोडे क्रमांक २२६६




**उभे शब्द :-**
१) शिखराचे टोक
२) कट्टर, ठाम मताचा
३) पक्षांचा समुह
५) कमळ
६) तुझा (क)
७) भाताच्या रोपांचे स्थलांतर करणे
८) दणकट, मजबूत
९) उपवासाचे तांदूळ
११) प्रवाहातून वाहत आलेला गाळसाळ
१३) अनुतीर्ण
१५) गडबड, धांदल
१६) रमापती
१८) युद्ध
२१) नदीची पातळी अतिशय वाढणे
२३) लाकूड कापण्याचे हत्यार
२४) कृष्णसखी
२५) वापर
२६) बेचव, पचपचीत
२७) कर्णेंद्रिय
२८) माता पिता
२९) फळातील द्रवपदार्थ
३०) परागमातीचा कण
३५) सहस्त्रवेळा
३६) छोटी युद्धनौका (इं)
३८) छाया
४०) प्रचंड, खूप
४२) वाडगा, मोठी वाटी
४६) संगीतातील एक राग
४८) लेखणी
५०) उपदेश, विचार, मसलत
५१) एक श्वासरोग
५२) मळलेला
५४) वृद्धत्व, थोडा
५५) थोडक्यात महाराष्ट्र राज्य
५६) मुरगळा
५८) नृत्य
६०) सन्यासाचे निवासस्थान
६२) लग्न
६४) छोटासा
६५) सुप्रसिद्ध
६६) नाविकदल
६७) अटीतील दोन शब्द
६८) फुलातील सुगंधी द्रव
६९) ललाट
७२) मनाला टोचणारे दु:ख
७४) अक्षरापुढची उभी रेघ

(उत्तर उद्याच्या अंकात)

**आडवे शब्द :-**
१) सोने
४) वरवधुची मिरवणूक
८) गाढव
१०) पातळ खांब
१२) जगण्यासाठी गरज असलेले
१४) कमीज बरोबरचे वस्त्र
१७) कूर्म
१९) जल
२०) धष्टपुष्ट मेंढा, मोठा
२२) महिना
२३) सत्वांश
२५) पीडा, त्रास, बाधा
२६) मंत्रीमंडळ
२८) टेकू, आश्रय
३१) सोंगड्या मांडण्याचे वस्त्र
३२) ढेकूण
३३) आश्चर्याची गोष्ट
३४) विना उद्देश
३७) कशा प्रकारचा ? विष
३९) पलंग, खाट
४१) प्रस्थान करणे
४३) छाती
४४) मांसाचे पक्वान्न
४५) लक्ष्मीचे एक नाव
४७) अज, मेंढा
४९) रसाळ
५१) ओलसर हवा
५३) एक कोल्हापुरी दागिना
५५) ढाक्याचे मऊ कापड
५७) हार, सर
५९) वंदनाचा एक शब्द
६१) चामडे, कातडे
६३) अस्थिर, हलणारी (संपत्ती)
६५) श्वसनेंद्रिय
६६) ध्वनी
६८) कैद
७०) मोठी टोपली
७१) मनात काही उद्देश धरून केलेले काम
७२) शिव शिव
७३) पवित्र, शुद्ध
७४) आजच्या आशीचा दिवस
७५) हनुवटीवरील दाट केस
७६) कंटाळवाणी कहाणी
७७) तपस्या
७८) किनार, कड
७९) परभारे

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# रेल्वेची किंमत किती?



मुंबईकरांसाठी ट्रेन तर 'लाईफ लाईन' आहे; पण ट्रेन बनवण्यासाठी किती खर्च येतो तुम्हाला माहिती आहे? सर्वात महत्त्वाची गोष्ट सांगायची झाली, तर भारतीय रेल्वेने दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. सामान्य डब्यांपासून ते वातानुकूलित डब्यांपर्यंत प्रत्येक डब्याचं बजेट वेगळं असतं.

ट्रेन बांधण्यासाठी मोठा खर्च येतो. प्रवाशांना तिकिटासाठी फक्त काही हजार रुपये मोजावे लागतात, परंतु एका ट्रेनची किंमत सत्तर कोटी रुपयांपर्यंत असू शकते. एका रिपोर्टनुसार, भारतीय रेल्वेच्या इंजिनची किंमत १५ ते वीस कोटी रुपयांपर्यंत असते. भारतात दोन प्रकारची रेल्वे इंजिन्स तयार केली जातात. एक डिझेल आणि दुसरे इलेक्ट्रिक. सुमारे ५२ टक्के भारतीय गाड्या अजूनही डिझेल इंजिनवर चालतात, पण रेल्वे हळूहळू विद्युतीकरणाकडे वाटचाल करत आहे. डिझेल इंजिनची किंमत सुमारे १३ कोटी आहे. ड्युअल–मोड इंजिनची किंमत सुमारे १८ कोटी आहे. इलेक्ट्रिक इंजिनची किंमत सुमारे वीस कोटी आहे.

एका एक्सप्रेस ट्रेनमध्ये २४ कोच असतात आणि प्रत्येक कोचची निर्मिती किंमत सुमारे दोन कोटी रुपये असते. सर्व कोचची एकूण किंमत सुमारे पन्नास कोटी रुपये असते. इंजिनची किंमत जोडल्यास, एक्सप्रेस ट्रेनची सरासरी किंमत सुमारे सत्तर कोटी रुपये होते. याव्यतिरिक्त, अतिरिक्त बर्थ आणि सुविधांमुळे स्लीपर कोच अधिक महाग असतात. वातानुकूलन, प्रगत इन्सुलेशन आणि इलेक्ट्रिकल सिस्टिमने सुसज्ज असलेले एसी कोच सर्वात महाग असतात.

बहुतेक गाड्या आणि लोकोमोटिव्ह स्थानिक पातळीवर भारतीय रेल्वेच्या स्वतःच्या उत्पादन सुविधांमध्ये उत्पादित केले जातात. चित्तरंजन लोकोमोटिव्ह वर्क्स, डिझेल लोकोमोटिव्ह वर्क्स आणि इंटिग्रल कोच फॅक्टरी या ठिकाणी उत्पादनाच्या सुविधा आहेत. यामुळे उत्पादनाचा खर्च तर कमी होतोच, पण रेल्वे क्षेत्रातील मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत या भारताच्या उद्दिष्टांना बळकटी मिळते.

## कॅलिडोस्कोप

# हिंदी महासागरात मोठे छिद्र


हिंदी महासागरात भूस्वरूप कमी आहे. तज्ज्ञांच्या मते, हे जगातील सर्वात मोठे गुरुत्वाकर्षण छिद्र आहे. शास्त्रज्ञ संगणक तंत्रज्ञानाचा वापर करून पृथ्वीच्या आतील भागात असलेल्या विविध वस्तूंबद्दल सखोल माहिती मिळविण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे महासागरांमधील भयानक 'ब्लॅक होल' उघडण्यास मदत होईल.

**भूरूप म्हणजे काय?**

भारताच्या दक्षिणेस असलेल्या हिंदी महासागरात, एक विचित्र भूवैशिष्ट्य आहे, म्हणजेच 'भूगर्भ'. ते एका दृष्टिक्षेपात नकाशासारखे दिसते. सहसा नकाशानुसार समुद्राचा पृष्ठभाग असमान असणे अपेक्षित असते. केवळ पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणात मोठ्या प्रमाणात बदल झाल्यामुळे 'आयओजीएल' सारख्या काही महासागरांचा पृष्ठभाग रिकामा होतो. हे जग आकर्षणाचे केंद्र आहे, कारण समुद्रतळ खूप सामान्य आहे आणि तेथे ज्वालामुखीसारखी कोणतीही वस्तू नाही. म्हणूनच, येथे ज्वालामुखी नसले, तरी येथे गुरुत्वाकर्षण इतके कमी का आहे, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

**उकल करण्याचा प्रयत्न**

२०२३ मध्ये भारतीय विज्ञान संस्थेच्या शास्त्रज्ञांनी एका बदलाद्वारे ही समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांना १४० दशलक्ष वर्षांपूर्वी पृथ्वीची निर्मिती कोणत्या हालचाली आणि कोणत्या पद्धतीने झाली याचे संगणकीय चित्रण सापडले. गुरुत्वाकर्षणाचा अभाव होता असलेल्या प्रत्येक ठिकाणी ही बाब लक्षात आली. तपासणीनंतर सार्वजनिक केलेल्या अहवालांनुसार, पूर्वी समुद्राच्या तळाचे तुकडे अधिक रिकामे झाले. त्यामुळे उबदार आणि कमी घनतेचे धुके असलेले वस्तुमान तयार झाले. यावरून गुरुत्वाकर्षणाची चिन्हे आढळली. समुद्राखालील भागात अनपेक्षित आणि कोट्यवधी वर्षे जुन्या घटना किंवा त्यांच्यामुळे होणारी अशांतता किंवा जाडी याबद्दल तपशीलवार माहिती 'जिओफिजिकल रिसर्च लेटर्स'मध्ये प्रकाशित केली जाते.



# घटस्फोटानंतर मुलावर दुग्धाभिषेक

लग्नात आनंदसोहळा साजरा करणे ही सामान्य गोष्ट असते; पण एखाद्यानं घटस्फोटाचं मोठं सेलिब्रेशन केलं, हे ऐकून अनेकांना आश्चर्य वाटेल. एका तरुणाला त्याच्या आईने दुधानं अभिषेक घातला. त्यानंतर 'सुखी घटस्फोट' असा लिहिलेला केक कापून जंगी सेलिब्रेशन करण्यात आले.

काहींनी या कृतीवर टीका केली असली, तरी काहींनी युवकाच्या 'नव्या सुरुवातीचा' आनंद साजरा करण्याच्या पद्धतीचे कौतुकही केले आहे. याबाबत 'सोशल मीडिया'वरील वृत्तानुसार, युवकाची आई त्याच्यावर दूध ओतून त्याचा अभिषेक करत आहे. हिंदू संस्कृतीत अभिषेक हा शुद्धीकरण आणि नव्या सुरुवातीचा प्रतीक मानला जातो. त्यानंतर युवक 'सुखी घटस्फोट' असे लिहिलेल्या चॉकलेट केकजवळ येतो आणि हसतमुखाने तो केक कापतो. केकवरच त्याने लिहिले होते, की मी माझ्या माजी पत्नीला १२० ग्रॅम सोने आणि १८ लाख रुपये दिले आहेत. त्याने लिहिले, कृपया आनंदी राहा, स्वतःचा सन्मान करा. १२० ग्रॅम सोने आणि १८ लाख रुपये दिले आहेत, घेतले नाहीत. आता मी सिंगल, खुश आणि मुक्त आहे. माझं जीवन, माझे नियम! घटस्फोटानंतरही आयुष्याकडं नव्या दृष्टीने कसं पाहता येऊ शकतं याबाबत एक वेगळा विचार या घटनेनं नक्कीच पुढे आणला आहे.



# आईवडीलांची तक्रार थेट देवाकडे!

लहान मुलं म्हणजे चमत्कारिकच असतात. त्यांना काय आवडेल हे सांगता येत नाही. तसंच ते कशावरून रागावतील हेही सांगता येत नाही. बरं, रागावल्यानंतर काय करतील याचाही नेम नाही. एका चिमुकलीने तर चक्क देवालाच पत्र लिहिलं. पत्रात देवाकडे आईवडिलांची तक्रार केली. तक्रारही गोड होती आणि कारणही गोडच होतं.

इंग्लडच्या सॉमरसेटमध्ये एका आठ वर्षाच्या चिमुकलीने आईवडिलांकडे एक पप्पी मागितली. आई वडिलांनी पप्पी देण्यास नकार दिला. त्यामुळे लाडोबाई रुसल्या अन् तिने चक्क देवाकडेच मम्मी पप्पांची तक्रार केली. रागावलेल्या मुलीने चक्क देवाला पत्र लिहिलं. बरं, मुलीने देवाला पत्र लिहिलं, ही काही मोठी गोष्ट नव्हती. पण जेव्हा सहा महिन्याने या पत्राचं उत्तर आलं, तेव्हा तिचे मम्मी पप्पाही आश्चर्यचकीत झाले. या पत्रातील उत्तरही मजेशीर होतं. तू कुत्रा पाळ असा सल्ला त्यात देण्यात आला होता. थेट देवाकडूनच उत्तर आल्याचं पाहून ही मुलगी जाम खूश झाली, पण हे पत्र आलं तरी कुठून? कुणी पाठवलं उत्तर? या विचारानेच मुलीच्या आईवडिलांना पछाडलं आहे.

या मुलीच्या आईने ही मजेशीर गोष्ट नाव न छापण्याच्या अटीवर सांगितली. कुणी पत्र पाठवलं हे समजलं नाही, पण या मागचं रहस्य मला खूप आवडलं. पत्राचं उत्तर मिळणं नेहमीच चांगलं वाटतं, असं या मुलीच्या आईने म्हटलं आहे. या मुलीच्या आईवडिलांनी मुलीचं पत्र आणि त्याला आलेलं उत्तर दोन्ही पत्रे रेडिटवर शेअर केलं आहे. माझ्या मुलीने देवाला लिहिलेल्या पत्राचं उत्तर कुणी दिलं? असं कॅप्शन रेडिटवर देण्यात आलं होतं.

या घटनेनंतर आता नवा पेच निर्माण झाला आहे. या मुलीच्या आईवडिलांनी हा पेच सांगितला. माझ्या आठ वर्षाच्या मुलीला पाळीव कुत्रे खूप आवडतात. आमच्याकडे आधी एक कुत्रा होता. पण ती वारंवार रेस्क्यू सेंटरमधून अजून एक कुत्रा आणण्याची मागणी करत होती. आम्ही तिला अजून एक कुत्रा घरी आणण्यास नकार दिला. त्यामुळे ती त्रस्त झाली आणि नाराजही झाली होती. त्यातच तिला आम्ही पप्पी दिली नाही. त्यामुळे तर तिचं नाक रागाने लालेलाल झालं. त्यानंतर ती बेडरूममध्ये गेली आणि एक बंद लिफाफा घेऊन बाहेर आली, असं या पत्रात म्हटलं.



तिने लिफाफा लेटर बॉक्समध्ये टाकला. सहा महिन्यानंतर तिच्या नावावर एक टाईप केलेलं पत्र आलं. एका प्रीपेड रॉयल लिफाफ्यात होतं. त्यावर परतीचा पत्ता नव्हता. पोस्टल विभागाचा शिक्काही नव्हता. केवळ हाताने लिहिलेलं पत्र होतं. ही चिठ्ठी मिळाल्यानंतर मुलीचे आईवडील घाबरून गेले होते. एक तासभर तणावात होते. नंतर त्यांना मुलीने लिहिलेलं पत्र आठवलं. या पत्रात कुत्रा दत्तक घेण्याचं माझं स्वप्न पूर्ण होईल का? असा सवाल या मुलीने केला होता. या पत्रात त्यावर उत्तर होतं. माफ करा. तुम्हाला पत्र लिहिण्यात उशीर झाला. ईश्वराला वाटतं तुझी या गोष्टीबाबत हरकत नसावी. देवानेच मला पत्र लिहायला सांगितलं आहे. देव प्रत्येकाची प्रार्थना ऐकतो. तो योग्यवेळी उत्तर देतो. तुला कुत्रा पाळण्याचा सल्ला दिला जात आहे, असं या चिठ्ठीत म्हटलं होतं. त्यानंतर या मुलीने कुत्रा पाळण्याचा हट्ट धरला.

# धातू खाणारा माणूस!

एखादा माणूस धातू, प्लास्टिक खाऊ शकतो, यावर आपला विश्वास बसणार नाही. सर्वसामान्य माणसाला विमान खाता येणार नाही. पण या जगात बऱ्याच चित्रविचित्र घटना घडत असतात. चमत्कार होत असतात. असाच एक चमत्कार म्हणजे मिचेल लोटिटो. मिचेल लोटिटो फ्रान्सचे रहिवासी होते. ते आपल्यासारखे भात, पोळी, भाजी, मांस, अंडी असे पदार्थ खाऊ शकत नव्हते. त्यांना धातूचे पदार्थ लागायचे. भात, पोळी, भाजी त्यांना पचायचंच नाही. पण लोखंडासारखा धातू ते अगदी सहज पचवायचे. १५ जून १९५० या दिवशी फ्रान्समधल्या ग्रेनोबेलमध्ये मिचेल यांचा जन्म झाला. सोळाव्या वर्षापासून ते धातूच्या वस्तू खाऊ लागले. मिचेल यांना पिको नावाचा आजार होता. हा आजार असणारा माणूस अन्न पचवू शकत नाही पण तो धातू अगदी सहज पचवू शकतो. सुरूवातीच्या काळात लोटिटो नखं, काचेचे तुकडे खात असत. विशेष म्हणजे ते काच अगदी सहज पचवायचे मात्र लोटिटो केळी, अंडी, ब्रेड हे पदार्थ पचवू शकत नव्हते. लोटिटोची ख्याती संपूर्ण जगात पसरू लागली. मग १९६६ पासून त्यांनी आपली ही असामान्य क्षमता जगापुढे सादर करायला सुरूवात केली. ते कार्यक्रम करू लागले. लोटिटो यांचे कारनामे बघण्यासाठी लोकांची गर्दी होऊ लागली. लोक तिकिट काढून त्यांचे कार्यक्रम बघायला येत. लोटिटो यांनी लोकांसमोर पलंग, टीव्ही, कॉम्प्युटर, सायकल तसंच धातूच्या विविध वस्तू खाल्ल्या. लोटिटो खनिज तेलही पित असत. धातू गिळणं सोपं जावं यासाठी ते खनिज तेल प्यायचे. लोटिटो यांनी १९७८ मध्ये एक विमान खायला सुरूवात केली. दोन वर्षांत म्हणजे १९८० पर्यंत त्यांनी हे विमान फस्त करून टाकलं होतं. १९५९ ते १९९७ या काळात मिचेल लोटिटो यांनी जवळपास नऊ टन म्हणजे ८१६४ किलो धातू खाल्ला होता. याच कारणामुळे त्यांचं नाव गिनिज बुकमध्ये नोंदवण्यात आलं होतं. २५ जून २००७ या दिवशी त्यांचा मृत्यू झाला.




# मधुचंद्रात फुला-फळांची सजावट!



लग्नाचा हंगाम सुरु झाला आहे. लग्नाशी संबंधित अनेक रितीरिवाजांच्या चर्चा नेहमीच होत असतात, परंतु लग्नाच्या पहिल्या रात्री बेडरुम सजवण्यासाठी शक्यतो सुवासिक फुलांचा वापर होत असतो. पती आणि पत्नी पहिल्यांदा एकमेकांचे होतात. बिछान्यावर सुंगधित फुलांची सजावट केली जाते. परंतु एका घटनेत खोली फुलांबरोबरच फळांनी सजवलेली होती.

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधलेल्या असतात. दोन जीव रेशमाच्या बंधनात अडकतात, तेव्हा त्यांच्यासाठी ही मधुचंद्राची रात्र एकमेकांना समजून घेण्यासाठी महत्वाची असते. मधुचंद्राच्या रात्रीसाठी घरातील बेडरुमला खूप सजवलेले असते. नवपरिणित वधू–वराला कसली अडचण होऊ नये, याची दक्षता घेतली जाते. त्यामुळे मंद सुंगधाच्या फुलांची उधळण केलेली असते.

व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये मधुचंद्राच्या रात्रीच्या एका खोलीचा भाग दाखवला आहे. या खोलीला फुलांनी सजवलेले दिसत आहे. निरनिराळी फुले या रुममध्ये मांडलेली दिसत आहे. बिछान्यावरदेखील फुलांचा सडा पडलेला दिसत आहे; मात्र यात एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे फुलांसोबत फळेही लटकवलेली आहे. या फळांमध्ये अननस आहेत. या फळांचा पडदा जणू तयार करण्यात आलेला आहे. गुलाबी आणि पांढऱ्या फुलांनी बिछान्यावर हृदयाचा आकार काढलेला आहे. मध्येच द्राक्षे, सफरचंद, अननस, डाळींबं, संत्री, टरबूज आदी फळे लटकलेली दिसत आहेत.

# पक्षी नव्हे, डायनासोर...



डायनासोरबद्दलचं आकर्षण अद्यापही कमी झालेलं नाही. डायनासोर नष्ट होऊन कोट्यवधी वर्षं लोटल्यानंतरही त्या युगाबाबत शोध सुरू आहे. शास्त्रज्ञांना अधूनमधून डायनासोरचे अवशेष मिळत असतात. मध्यंतरी म्यानमारमध्ये जगातल्या सर्वात छोट्या आकाराच्या डायनासोरचे अवशेष सापडले. हा डायनासोर पक्ष्यासारखा होता. अवघ्या दोन इंच आकाराचा हा डायनासोर हमिंगबर्डपेक्षाही छोट्या आकाराचा होता. झाडाच्या खोडातल्या फटीत डोकं अडकल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. हा डायनासोर ९९० लाख वर्षांपूर्वी अस्तित्वात होता, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हा डायनासोर परागकण खात नव्हता तर छोटे किडे आणि सुरवंटांना आपलं भक्ष्य बनवत असे. शास्त्रज्ञांनी संगणकावर याची प्रतिकृती तयार केली आहे. या डायनासोरच्या तोंडात १०० दात असल्याचं दिसून आलं. सर्वात छोट्या आकाराच्या डायनासोरचे अवशेष सापडल्यामुळे शास्त्रज्ञ डायनासोर युगाची उकल अधिक चांगल्या प्रकारे करू शकतील.

अशा या अनोख्या पक्ष्याचे अवशेष सुरक्षित होते, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. पक्ष्यासारखा डायनासोर सापडल्यामुळे शास्त्रज्ञांनीही आश्चर्य व्यक्त केलं आहे. या डायनासोरच्या शरीराची रचना अनोखी असल्याचं शास्त्रज्ञांनी म्हटलं आहे. पक्ष्याच्या आकाराच्या डायनासोरचे अवशेष सापडणं ही सकारात्मक बाब म्हटली पाहिजे. यामुळे काळाच्या ओघात दडलेली बरीच गुपितं उलगडण्याची शक्यता नाकारता येत नाही.



# ३५ वर्षांनी हाती आले फोटो...

इंग्लंडमधल्या एका जोडप्याने तब्बल ३५ वर्षांनी आपल्या लग्नाचे फोटो बघितले. १९८५ मध्ये त्यांचं लग्न झालं होतं. मात्र लग्नाच्या दिवशीच एक बॅग चोरीला गेली. या बॅगेत दागिने, पैसे तर होतेच पण त्यांच्या लग्नाच्या फोटोंचा रोलही होता. २०२० मध्ये या जोडप्याच्या लग्नाला ३५ वर्षं पूर्ण झाले. मिक आणि ट्रेसी असं या जोडप्याचं नाव आहे. लग्नाच्या स्वागत समारंभादरम्यान दोन चोरांनी त्यांची बॅग चोरून नेली. काही लोकांनी या चोरांचा पाठलाग केला. पण चोर पळून गेले. चोरांनी पैसे, दागिने आणि कॅमेरा काढून बॅग रस्त्यावर टाकून दिली. या बॅगमध्ये लग्नप्रसंगी फोटो टिपणाऱ्या कॅमेऱ्यातला रोल होता. एंजी मखेल नावाच्या महिलेला ही बॅग सापडली. या बॅगमध्ये कॅमेऱ्यातला रोल होता. तिने फोटो डेव्हलप करून घेतले. हे कोणाच्या तरी लग्नाचे फोटो असल्याचं तिच्या लक्षात आलं. पण त्यावेळी संपर्काची साधनं नसल्यामुळे तिला या जोडप्याला फोटो देता आले नाहीत. हे फोटो तिने जपून ठेवले होते. घर बदलण्याच्या वेळी सामानाची बांधाबांध करताना एंजीला हे फोटो सापडले. मग तिने यातले काही फोटो फेसबुकवर शेअर केले. या फोटोतल्या जोडप्याला ओळखणाऱ्यांनी आपल्याशी संपर्क साधावा, असं आवाहनही केलं. ट्रेसीच्या नातेवाईकाने हे फोटो बघितले आणि तिला याची माहिती दिली. मग ट्रेसीने एंजीशी संपर्क करून घराचा पत्ता दिला. एंजीने हे सगळे फोटो २०२० मध्ये ट्रेसीच्या हवाली केले.



# मेक्सिकोतलं गूढ शहर

यापृथ्वीतलावरची अनेक गुपितं अजूनही उलगडलेली नाहीत. बरेच शास्त्रज्ञ ही गुपितं उलगडण्याचा प्रयत्न करताना दिसतात. असंच एक गूढ गुपित म्हणजे मेक्सिकोमधलं टियाटिहुआकन नावाचं शहर. या शहराला 'प्लेस ऑफ गॉड' म्हणजे देवाची जागा असंही म्हटलं जातं. या शहराची निर्मिती कशी झाली, इथे कोण रहात होतं हे कोणालाही माहीत नाही. म्हणूनच या ठिकाणाबद्दल प्रचंड कुतुहल निर्माण झाल्याचं पहायला मिळतं. टियाटिहुआकन या शहरात असंख्य पिरॅमिड्स आहेत. एजटेक्स साम्राज्यातल्या लोकांनी चौदाव्या शतकात हे शहर शोधलं. त्यांनीच या शहराला टियाटिहुआकन असं नाव दिलं. त्याआधी या स्थानाला कोणतंही नाव नव्हतं. हे शहर म्हणजे एक चमत्कारच आहे. अनेकांना हे स्थान आपोआप प्रगट झाल्याचं वाटतं. या स्थानाचे उल्लेख कुठेही आढळत नाहीत. इथे एवढे पिरॅमिड्स कोणी बांधले हेही कोणाला माहीत नाही. या शहराची लोकसंख्या २५ हजारांच्या आसपास असावी, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या शहराचा परिसर खूप मोठा आहे. इथल्या एका पिरॅमिडच्या आत माणसांची हाडं सापडली होती. त्यामुळे हे स्थान अधिकच रहस्यमय बनून गेलं. या स्थानी माणसांचा बळी दिला जात होता, असंही काहींचं म्हणणं आहे.

# कुठे गेलं विमान?

बर्म्युडा ट्रॅंगल परिसरात बरीच विमानं, जहाजं गायब होतात. या विमानांचा काहीच पत्ता लागत नाही. बर्म्युडा ट्रॅंगलचं गूढ अद्यापही उकललेलं नाही. असंच एक गूढ गुपित काळाच्या पोटात दडलं आहे. मलेशियन एअरलाईन्सचं एक विमान असंच गायब झालं. आजतागायत त्या विमानाचा पत्ता लागलेला नाही. ही २०१४ ची घटना आहे. २३९ प्रवाशांसह मलेशियन एअरलाईन्सच्या विमानाने क्वालालंपूर विमानतळावरून उड्डाण केलं. हे विमान चीनची राजधानी बीजिंगला जाणार होतं. आठ मार्च २०१४ लाच हे विमान बीजिंगला पोहोचणार होतं. पण ते अचानक गायब झालं. या विमानाचा रडारशी संपर्क तुटला. त्यानंतर त्याचं काय झालं हे कोणालाही माहीत नाही. या विमानाचा शोध घेण्यासाठी बऱ्याच शोधमोहिमा राबवण्यात आल्या. पण हाती काहीच लागलं नाही.



मलेशियन एअरलाईन्सच्या विमानाचा शोध घेण्यासाठी अनेक देशांनी सहकार्य केलं, मदत देऊ केली. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. पण विमान आणि त्यातले प्रवासी काही केल्या सापडले नाहीत. या विमानात चीनच्या प्रवाशांची संख्या सर्वात जास्त होती. विमानाचा संपर्क तुटल्यानंतर अपहरण झाल्याचा अंदाज वर्तवण्यात आला. पण दहशतवाद्यांकडून कोणत्याही मागण्या झाल्या नाहीत. विमानाचा अपघात झाल्याची शक्यता लक्षात घेऊन त्या दृष्टीने शोध घेण्यात आला. पण सगळे प्रयत्न व्यर्थ ठरले. जवळपास एक लाख चौरस किलोमीटर परिसरात विमानाचा शोध घेण्यात आला. पण विमानाचे अवशेष किंवा प्रवाशांचे मृतदेह सापडले नाहीत. हे विमान नेमकं कुठे गेलं, त्याचं काय झालं याबाबत बरेच तर्कवितर्क लढवण्यात आले. पण आज सहा वर्षांनंतरही विमानाचा शोध लागलेला नाही.

## स्थानिकच्या निवडणुकांमध्ये वंचितने घेतली आघाडी




■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ११ :
स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून राजकीय पक्षांकडून उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. संभाव्य नाराजी नाट्य लक्षात घेता अद्याप प्रमुख पक्षांनी उमेदवारांच्या नावाचे पत्ते उघडले नाहीत.

युती व आघाड्या की स्वबळ याचा निर्णय गुलदस्त्यात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीने मात्र उमेदवार जाहीर करण्यात आघाडी घेतली. नगराध्यक्ष पदासाठी चार उमेदवारांची यादी वंचित आघाडीकडून बुधवारी दुपारी जाहीर केली आहे.

नगर पालिका व नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट नगराध्यक्षपदासाठी सार्वत्रिक निवडणूक होत आहे. कार्यक्षेत्रात आचारसंहिता लागू झाली. या निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास १० नोव्हेंबरपासून सुरुवात झाली. नामनिर्देशपत्र दाखल करण्याची अंतिम तारीख १७ नोव्हेंबर असून छाननी १८ नोव्हेंबर रोजी होईल.

वंचितकडून निवडूक लढण्यासाठी देखील अनेक इच्छूक आहेत. वंचितने अकोला जिल्ह्यातील चार नगराध्यक्षपदासाठी आपले उमेदवार जाहीर केले आहेत. ॲड. नतिकोद्दिन खतीब यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. बार्शीटाकळी नगर पंचायतीच्या नगराध्यक्षपदासाठी अख्तर खातून अलीमोद्दिन, मूर्तिजापूर नगर पालिका शेख इम्रान शेख खलील, अकोट स्वाती मंगेश चिखले व तेल्हारा नगराध्यक्षपदासाठी विद्या सिद्धार्थ शामस्कर यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

# ड्रिम प्रोजेक्टचा वाद न्यायालयात

### सिंदी येथील मल्टी-मोडल लॉजिस्टिक्स पार्क वांध्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
नॅशनल हायवेज लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट लिमिटेड (एनएचएलएमएल) यांनी नागपूर-वर्धा सीमेवरील सिंदी येथे उभारण्यात येणाऱ्या मल्टी-मोडल लॉजिस्टिक्स पार्क (सिंदी ड्राय पोर्ट) प्रकल्पासाठी नव्या निविदा (टेंडर) प्रक्रिया सुरू केली आहे.

सुमारे १५० एकर क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या आणि ६६० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या या प्रकल्पाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या महत्त्वाकांक्षी योजनांमध्ये स्थान आहे. हा देशातील ३५ मल्टी-मोडल लॉजिस्टिक्स पार्कपैकी एक असून, पंतप्रधानांच्या गती शक्ती उपक्रमाचा भाग आहे.

एनएचएलएमएलने नुकत्याच झालेल्या प्री-बिड बैठकीत पायाभूत सुविधा क्षेत्रातील चार नामांकित कंपन्यांनी प्राथमिक रस दाखवला आहे. आता लवकरच तांत्रिक आणि आर्थिक बोली प्रक्रिया सुरू होणार आहे. प्रकल्पाची उद्दिष्टे म्हणजे वाहतूक आणि मालवाहतुकीवरील खर्च कमी करणे तसेच लॉजिस्टिक्स कार्यक्षमतेत वाढ घडवून आणणे हे आहेत.

तथापि, या नव्या निविदा प्रक्रियेवर यूकेस्थित डेल्टा कॉर्प होल्डिंग्ज कंपनीने आक्षेप नोंदवला आहे. २०२३ मध्ये डेल्टा कॉर्पला या प्रकल्पाचे कंत्राट मिळाले होते. एनएचएलएमएलसोबत ४५ वर्षांसाठी झालेल्या या कराराअंतर्गत कंपनीने ३६० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्याची तयारी दर्शवली होती. मात्र, एनएचएलएमएलने प्रकल्पातील मंद गती आणि ठरलेले टप्पे पूर्ण न झाल्याचे कारण देत डेल्टा कॉर्पचा करार रद्द केला आणि नव्या निविदा काढल्या.



डेल्टा कॉर्पने या निर्णयाला अकाली आणि बेकायदेशीर म्हणत आक्षेप घेतला आहे. कंपनीच्या मते, प्रकल्पात विलंब हा त्यांच्या निष्काळजीपणामुळे नव्हे तर सरकारी मंजुरींमध्ये झालेल्या प्रशासकीय विलंबामुळे झाला. कंपनीच्या म्हणण्यानुसार, अंतिम मास्टर प्लॅन जानेवारी २०२५ मध्ये मंजूर झाला आणि त्यानंतर इंजिनिअरिंग, प्रोक्युरमेंट, कन्स्ट्रक्शन कामे तत्काळ सुरू झाली होती.

कंपनीचा दावा आहे की प्रकल्प जुलै २०२६ पर्यंत पूर्ण होऊ शकला असता आणि स्टील तसेच ऑटोमोबाईल क्षेत्रातील अनेक उद्योग ऑक्टोबर २०२५ पासून कार्य सुरू करण्याच्या तयारीत होते. मात्र, करार रद्द झाल्याने त्या योजना विस्कळीत झाल्या. डेल्टा कॉर्पने गती शक्ती उपक्रमाच्या उद्दिष्टांना धक्का पोहोचवणारा हा निर्णय असल्याचे म्हटले आहे.

दरम्यान, एनएचएलएमएलने प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी त्वरित नव्या निविदा प्रक्रिया राबवण्यास सुरुवात केली असून, आवश्यक असल्यास संस्था स्वतः प्रकल्प राबवण्याचाही पर्याय विचाराधीन आहे. दुसरीकडे, डेल्टा कॉर्पने करार रद्दबातल ठरवण्यासाठी न्यायालयात दाद मागितली आहे. त्यामुळे सिंदी ड्राय पोर्ट प्रकल्पाचे भवितव्य सध्या न्यायालयीन निकालावर अवलंबून आहे.

## दीडशे तहसीलदारांना पदोन्नती, एमपीएससीच्या विद्यार्थ्यांवर गंडांतर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, आगामी काळात महापालिकेच्या निवडणुका होणार आहेत. या अनुषंगाने राज्य सरकारला मनुष्यबळाची मोठी गरज भासणार आहे. यासाठी एमपीएससीमार्फत पदभरती करणे सोडून उपजिल्हाधिकारी ही पदे रिक्त नसतानाही जवळपास दीडशे तहसीलदारांना उपजिल्हाधिकारी पदावर पदोन्नती देण्यात येणार असल्याची माहिती आहे. यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांमध्ये खळबळ उडाली आहे.

राज्यातील १५० तहसीलदारांना पदोन्नतीद्वारे उपजिल्हाधिकारीपदावर बढती देण्यात येणार आहे. याबाबतची प्रक्रिया महसूल विभागात सुरू आहे. मात्र पदोन्नतीने उपजिल्हाधिकारीपदाच्या कोट्यातील एकही जागा रिक्त नसताना १५० जणांना पदोन्नती देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप केला जात आहे.

राज्यात उपजिल्हाधिकारी संवर्गाच्या ६०० जागा आहेत. यापैकी ३०० जागा एमपीएससीच्या भरतीतून तर ३०० जागा तहसीलदारपदावरून पदोन्नती होणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी राखीव असतात. निम्म्या-निम्म्या जागांचा हा समतोल साधला जाणे सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक आहे. तसे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशही आहेत.

एमपीएससीतून भरती होणाऱ्या उपजिल्हाधिकारी पदाच्या ५८ जागा रिक्त आहेत. पण, राज्य सरकारकडून योग्य वेळेत एमपीएससीकडे त्याबाबतची मागणी नोंदवली गेली नसल्यामुळे ही भरती इतक्यात होणे शक्य नाही.

दुसरीकडे तहसीलदार पदावरील व्यक्तीला बढती देऊन उपजिल्हाधिकारी करण्यासाठी सेवा ज्येष्ठता यादी अंतिम करावी लागते. शिवाय या कोट्यातील जागाही रिक्त असाव्या लागतात. सध्या या कोट्यातील जागा रिक्त नाहीत. त्यानंतरही १५० तहसीलदारांना पदोन्नतीने उपजिल्हाधिकारी करण्यात येणार आहे.

स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी एमपीएससीच्या माध्यमातून तहसीलदार उपजिल्हाधिकारी अशा विविध पदावर नोकरी मिळवण्याची अपेक्षा करतात. मात्र उपजिल्हाधिकारी पदे ही पदोन्नतीने भरली गेल्यास अशा विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येण्याचे संकेत आहेत.

## महापरिनिर्वाण दिनानिमित सुविधांबाबत सूक्ष्म नियोजन करा



मुख्य सचिव राजेश कुमार यांचे निर्देश

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दरवर्षी लाखो अनुयायी मुंबईतील दादर येथील चैत्यभूमीवर येतात. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सोयीसुविधांसाठी सर्व विभागांनी समन्वयाने सूक्ष्म नियोजन करून त्याची अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्य सचिव राजेश कुमार यांनी दिले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने चैत्यभूमी व शिवाजी पार्क येथे पुरविण्यात येणाऱ्या सुविधांबाबत मुख्य सचिव राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राजेश कुमार म्हणाले, चैत्यभूमी परिसरात मंडप व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. दादर व आसपासच्या परिसरात वाहतूक पोलीस यंत्रणांनी रहदारीचे योग्य नियोजन आणि नियंत्रण करावे. अनुयायांना मार्गदर्शन मिळावे यासाठी जागोजागी सूचना फलक लावावेत. प्रत्येक विभागाने त्यांची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

भोजन व्यवस्था, आरोग्य सुविधा, सुरक्षाव्यवस्था, पिण्याचे पाणी, शौचालय सुविधा, परिसर स्वच्छता, सीसीटीव्हीची व्यवस्था, विद्युतव्यवस्था, पुस्तकांचे स्टॉल, तसेच शासकीय जाहिरात व प्रसिध्दी या विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीच्या वतीने कांबळे यांनी विविध मागण्या मांडल्या. यावेळी महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती सादरीकरणाद्वारे देण्यात आली.

## : मुलखावेगळी माणसं :
## विक्रमवीर वाजीद



लोकमानस

मंदसौरपासून ११ किलोमीटर अंतरावर सोनगिरी नावाचे एक छोटे गाव आहे, तिथेच वाजिद खान यांचे लालनपालन व पोषण झालेले आहे. त्यांच्या नावाचे पाच जागतिक विक्रम वर्ल्ड रेकॉर्ड बुकमधे नोंद झालेले आहेत.

मुंबईपासून ते दुबईपर्यंत त्यांच्या कलेचे कौतुक होत असते. नेल आर्ट पासून ते शिल्पकलेपर्यंत विविध कलांत त्यांनी कौशल्य मिळवले आहे आपल्या कलेने त्यांनी अनेक कलाप्रेमी लोकांना आकर्षून घेतले आहे.

वाजिद यांचे बालपण मंदसौरजवळच्या एका छोट्या गेलेले आहे.. परंतु मन चंचल आणि विचार कलात्मक होते. त्यामुळे ते साधारण वस्तूपासून असाधारण रचनात्मक कार्य करण्याचे सतत प्रयास करत असत. ते शाळेच्या अभ्यासात अत्यंत कच्चे होते, त्यांना पाढे सुद्धा पाठ होत नसत. जेव्हा शेती करणारे वडील त्यांच्या वर नाराज होत होते, त्यावेळी वाजिद जगातील सर्वात छोटी प्रेस बनविण्यात मग्न होते.

स्टीलचा वापर करून वाजिद यांनी जगातील सर्वात छोटी इस्त्री बनवून सवार्नाच आश्चर्यचकित केले होते. यांच्यावरची वाहने बनवल्यावर त्यांनी आकाशात उडणारे हेलिकॉप्टर बनवून टाकले. बनविण्यात आलेल्या रचनांची जेव्हा प्रशंसा होऊ लागली तेव्हा वाजिद यांच्या स्वप्नांचे पंख फडफडू लागले.

युवा अवस्थेत पोहोचेपर्यंत त्यांनी पाणी चोरी रोखण्यासाठीच्या यंत्रासह एकून २०० शोध करून टाकले. हे सर्व शोध ज्यांनी बघितले ते थक्कच झाले. परंतु उचित मार्गदर्शनाच्या अभावी ह्या शोधांना ते उचित प्रसिद्धी मिळवू शकले नाहीत.

घरात कला रसिक येत राहिले आणि वाजिदच्या कलेवर घरच्या लोकांचा राग वाढत गेला. शेवटी शाळा सोडल्यानंतर त्यांनी घर सोडायचा पण निर्णय घेतला.आणि त्यानंतर कलेला ओळख प्राप्त करून देणे व आपले जीवन सफल करण्यांसाठी वाजिद यांचा खऱ्या अर्थाने संघर्ष सुरू झाला.

इंदूरमध्ये त्यांनी आपले चित्रकलेतले कौशल्य दाखविले परंतु वाजिद यांचे समाधान झाले नाही. त्यांना मुळात आवड होती ती सामान्य वस्तूपासून असाधारण वस्तू बनवायची. त्यांनी चित्रकला सोडून हातात थमाकोल घेतला. १९९८ मध्ये त्यांनी थमाकोलपासून कलात्मक वस्तू बनवायला सुरुवात केली; त्यास लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

वाजिद यांनी २००२ मध्ये एका अशा कलेवर काम सुरू केले की ज्यावर जगात कोणीच काम केले नसेल. अतिशय छोट्या छोट्या खिळयांना एका विशिष्ट शैलीत कार्डबोर्डावर ठोकत-ठोकत त्यांनी तेथे मानवी चेहरा उतरवला.

पुढे चालून हातात इतके प्राविण्य निर्माण झाले कि खिळयांचा काळा भाग व बोर्डचा पांढरा भाग अश्या प्रकारे प्रभाव सोडायला लागला की बनविलेला चेहरा बोलका वाटायला लागला.

नेल आर्ट ही जगामधली अजब कला आहे आणि जेव्हा वाजिद यांनी २००५ मध्ये याच माध्यमातून महात्मा गांधी यांचे पोट्रेट बनविले तेंव्हा ते बघणाऱ्यांना हे बघुन एक सुखद धक्का बसला. ह्याच वर्षी वाजिद यांनी जगातली पहिले थ्री डी चित्र बनविले, त्यामधे केनवास वर ऐक्रेलिक कलरचा वापर केला. २००९ पर्यंत नेल आर्टला ओळख मिळालेली होती. काही काळ गेल्यानंतर वाजिद यांनी त्याचे आपले नावावर पेटेंट करून घेतले. येथूनच वाजिद यांचे नाव वर्ल्ड रिकार्ड बुक्स मधे आले.

■ ■ ■

## १० वी च्या परीक्षेचे अर्ज विलंब शुल्कासह भरण्यास मुदतवाढ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परिक्षेस बसणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने त्यांच्या शाळा प्रमुखांमार्फत भरावयाचे आहेत.

**१७ नोव्हेंबर अखेरची मुदत**

विलंब शुल्कासह अर्ज भरण्यास १७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे पुनर्परिक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, आयटीआय (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे ट्रान्सफर ऑफ क्रेडिट घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे अर्ज त्यांच्या शाळा प्रमुखांमार्फत प्रचलित पद्धतीने भरावयाची आहेत.

हे अर्ज mahahsscboard.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन पद्धतीने भरावयाच्या विलंब शुल्काच्या तारखांना अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. या तारखांना पुनःश्च मुदतवाढ देण्यात येणार नाही, असेही मंडळामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

## माफियांना सत्तेचा मार्ग प्रशस्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
सत्ताधारी भाजप माफिया वृत्तीच्या लोकांसाठी सत्तेचा मार्ग प्रशस्त करत असल्याची टीका काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केली आहे. भाजपचे बोलायचे व खायचे दात वेगळे आहेत, हे आता लोकांना कळले आहे. त्यामुळेच आज महाराष्ट्रात कुठे नेऊन ठेवला आमचा महाराष्ट्र असे मत तयार होत आहे, असे ते म्हणालेत.

तुळजापूर येथील ड्रग्ज तस्करी प्रकरणातील आरोपींना भाजपमध्ये प्रवेश दिल्यामुळे राज्याचे राजकारण तापले आहे. या प्रकरणी विरोधकांकडून भाजपवर टीकेची झोड उठली आहे. काँग्रेस नेते नाना पटोले यांनीही या प्रकरणी भाजपवर निशाणा साधून हा सत्ताधारी भगवा पक्ष माफिया वृत्तीच्या लोकांना सत्तेचा मार्ग प्रशस्त करत असल्याचा आरोप केला.

ते म्हणाले, भाजपने मागे नाशिक येथील एका माफियावर विधानसभेत आरोप केले होते. पण त्यानंतर त्यालाच आपल्या पक्षात घेतले. भाजप स्वतःला पार्टी विथ द डिफरन्स अशी उपाधी देतो. पण आता त्यांचेच लोक आता आपल्या पक्षात भ्रष्ट लोकांना वॉशिंग मशिनमध्ये धुवून स्वच्छ करण्यात येत असल्याची विधाने करत आहेत. भाजप कोणत्याही जिल्ह्यातील माफिया वृत्तीच्या लोकांना पक्षात घेऊन त्यांना सत्तेचा मार्ग देण्याचा प्रयत्न करत आहेत, असे टीकास्त्र नाना पटोले यांनी भाजपावर डागले.

## मैत्रिणीवर वार स्वतःलाही भोसकले

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १२ :
मोबाईल देण्यास नकार दिल्याने न्यायालयात काम करणाऱ्या तरुणीच्या कथित मित्राने तिच्यावर चाकूने वार केला. यावेळी उपस्थित तरुणीच्या बहिणीने बचाव केल्याने तरुणी बचावली. दरम्यान कथित मित्र असलेल्या युवकाने स्वतःवर चाकूने वार करून घेतल्याने तो जखमी झाला. या घटनेत जखमी युवतीची प्रकृती गंभीर असून तिच्यावर मलकापूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहे.

मोबाईल देण्यास नकार दिल्याने २५ वर्षीय तरुणीवर युवकाने चाकूने हल्ला केला. त्यानंतर आरोपीने स्वतःच्याच गळ्यावर वार करून स्वतःलाही जखमी केले. आरोपी युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरूणीची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

## आईशर ट्रक्स अँड बसेसने लॉन्च केली
# आईशर प्रो एक्स डिझेल श्रेणी




कमर्शियल व्हेइकल्सची व्यवसाय शाखा आईशर ट्रक्स अँड बसेसने आईशर प्रो एक्स डिझेल लॉन्च केल्याचे जाहीर केले. त्यांनी 2 ते 3.5 टन स्मॉल कमर्शियल व्हेइकल सेगमेन्टमध्ये आपल्या नेक्स्ट-जनरेशन वाहनाची भर घातली.

या वर्षाच्या आरंभी भारत मोबिलिटी ग्लोबल एक्सपोमध्ये आईशर प्रो EV यशस्वीरित्या लॉन्च केल्यानंतर या डिझेल व्हेरियन्टचे लॉन्चिंग हे इंधन क्षमतेतील आईशरचे या उद्योगातील आघाडीचे नैपुण्य आणि डिझेल चालित सोल्यूशन्सची मागणी करणाऱ्या ग्राहकांसाठी आणि प्रदेशासाठी अंमलबजावणी उत्कृष्टता यांची सांगड घालते.चार दशकांपासून कमर्शियल वाहन उद्योगात आघाडीवर असलेली आईशर ट्रक्स अँड बसेस, नवीन आईशर प्रो डिझेलसह लास्ट-माईल लॉजिस्टिक्समध्ये क्रांती घडवण्यास वचनबद्ध आहे.

ग्राहकांसह विकसित केलेली आणि एक एक्स्पर्ट सोल्यूशन म्हणून तयार केलेली ही नवी डिझेल श्रेणी आपला या श्रेणीतील सर्वोत्तम परफॉर्मन्स, उत्कृष्ट अपटाइम आणि सहज मालकीसह छोट्या व्यवसायांना, फ्लीट संचालकांना आणि ग्राहकांना सेवा प्रदान करण्यास सज्ज आहे.

आईशर प्रो मध्ये विशिष्ट उद्देशाने बनवलेले संपूर्ण नवीन ए 449 हे खास डिझेल इंजिन आहे, जे या श्रेणीतील सर्वोत्तम इंधन क्षमता आणि शक्ती प्रदान करते आणि त्यामुळे सर्व प्रकारच्या प्रदेशांमध्ये उत्तम परफॉर्मन्स मिळतो आणि वाहन चालवणे सोपे होते.

■ ■ ■

## ...असा लागला मिक्सरचा शोध

मिक्सरचा शोध एका विशिष्ट व्यक्तीने लावलेला नाही, तर आधुनिक मिक्सर हे अनेक दशकांमधील सुधारणा आणि तंत्रज्ञानाचा परिणाम आहे. आणि त्याचे यशः १९८० च्या दशकात 'पॉवर कंट्रोल अँड अप्लायन्सेस' कंपनीने 'सुमित' नावाचा मिक्सर बाजारात आणला.

सुरुवातीच्या काळात, स्वयंपाकघरात वस्तू बारीक करण्यासाठी पारंपरिक पद्धती वापरल्या जात होत्या, पण १९८० च्या दशकात 'पॉवर कंट्रोल अँड अप्लायन्सेस' या कंपनीने भारतात 'सुमित' मिक्सरचा ब्रँड सुरू केला. हा ब्रँड इतका लोकप्रिय झाला की, तो घराघरात आवश्यक वस्तू बनला.

सुरुवातीला मसाले, डाळी इत्यादी वाटण्यासाठी दगडी पाटा-वरवंटा किंवा जाते यांसारख्या पारंपरिक साधनांचा वापर केला जात असे, ज्यात खूप वेळ आणि मेहनत लागत असे.

कालांतराने, यांत्रिक उपकरणांचा विकास होत गेला. यामध्ये मोटरचा वापर करून वस्तू बारीक करण्याची सोय उपलब्ध झाली.'सुमित' मिक्सर



या कंपनीने दर महिन्याला ५०,००० मिक्सर विकण्याचा विक्रम केला होता आणि काही काळ 'सुमित' हा मिक्सरचा एकमेव ब्रँड होता. यामुळे मिक्सर हे स्वयंपाकघरातील एक अत्यावश्यक उपकरण बनले. मिक्सरचा शोध एकाच व्यक्तीने लावलेला नसला तरी, सुमित मिक्सरने त्याला भारतात घरगुती उपकरण म्हणून लोकप्रिय बनवले..

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# महावितरणच्या क्रीडास्पर्धा म्हणजे संघभावनेचा संस्कार

### संचालक राजेंद्र पवार यांचे प्रतिपादन : महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडास्पर्धेचे अमरावतीमध्ये थाटात उद्घाटन




■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १२ :
महावितरणने खेळाडूंना नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. अनेक महिला व पुरुष खेळाडू राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकले आहेत. कोणत्याही सांघिक खेळ प्रकारात खेळाडूंमधील परस्पर सहकार्य, समन्वय व विश्वास या त्रिसुत्रीशिवाय विजय शक्य होत नाही. त्यामुळे खेळाडूंमध्ये प्रथम संघभावना निर्माण होणे आवश्यक आहे. महावितरणच्या दरवर्षी होणाऱ्या राज्य क्रीडा स्पर्धा या महावितरणच्या कर्मचाऱ्यांसाठी एकजुटीचा व संघभावनेचा संस्कार आहे असे प्रतिपादन संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी बुधवारी केले.

अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या क्रीडा संकुलात राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटक म्हणून संचालक पवार बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयोजन समितीचे अध्यक्ष व मुख्य अभियंता अशोक साळुंके होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कोकणचे सहव्यस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे, पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे, मुख्य अभियंते सुहास रंगारी, दिलीप दोडके, स्वप्नील काटकर, चंद्रमणी मिश्रा, संजय पाटील, राजेश नाईक, अरविंद बुलबुले, संजीव भोळे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, महाव्यवस्थापक राजेंद्र पांडे तसेच प्राचार्य श्रीनिवास देशपांडे यांची उपस्थिती होती.

या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत महावितरणच्या १६ परिमंडलाच्या संयुक्त आठ संघातील सुमारे ११७० महिला व पुरुष खेळाडू सहभागी झाले आहेत. या खेळाडूंनी संचलन करून पाहुण्यांना मानवंदना दिली.

प्रास्ताविक आयोजन समितीचे अध्यक्ष व मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले. सूत्रसंचालन सौ. क्षिप्रा मानकर, विजय पांडे यांनी केले तर उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे यांनी आभार मानले. या क्रीडा स्पर्धेत २२ खेळ प्रकारातील सामने रंगणार असून येत्या शनिवारी (दि. १५) समारोप होणार आहे.



### प्रिया, गुलाबसिंगची बाजी

अतिशय चुरशीच्या १०० मीटर धावस्पर्धेत पुरुष गटात गुलाबसिंग वसावे (पुणे-बारामती) यांनी सुवर्णपदक तर साईनाथ मसाणे (सांघिक कार्यालय-भांडूप) यांनी रौप्यपदक पटकावले. तर महिला गटात प्रिया पाटील (सांघिक कार्यालय-भांडूप) यांनी सुवर्णपदक तर श्वेतांबरी अंबादे (नागपूर-चंद्रपूर-गोंदिया) यांनी रौप्यपदक मिळवले. विजेत्यांना संचालक राजेंद्र पवार यांच्याहस्ते सुवर्ण व रौप्यपदक प्रदान करण्यात आले.